
छात्र

# प्रबोधन

वर्ष ४ अंक १२
सौर आषाढ शके १९१८



ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी अभिनव मासिक !

# ग्रंथालय - पुस्तक ठेव योजना

पुणे, सांगली व धुळे या ठिकाणी छात्र प्रबोधनद्वारा ग्रंथालये चालू असून त्याचे सहामाही शुल्क रु. २५/- आहे. विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचावीत अशी विविध विषयांवरील कथा-कादंबऱ्या, माहितीपर पुस्तके या ग्रंथालयामध्ये आहेत. त्या गावांमधील सभासदांनी तेथील स्थानिक कार्यालयामध्ये संपर्क साधून **ग्रंथालयाचे अवश्य सभासद व्हावे** व या संधीचा फायदा घ्यावा. या व्यतिरिक्त औरंगाबाद, ठाणे व नाशिक येथे स्थानिक व्यक्तिंनी जबाबदारी स्वीकारल्यास ग्रंथालये सुरू होऊ शकतील. इच्छुकांनी संपर्क साधावा.

## पुस्तक ठेव योजना

ज्या विद्यार्थ्याकडे वाचनीय पुस्तकांचा संग्रह आहे. अशांनी **आपल्याकडील पुस्तके छात्र प्रबोधनच्या ग्रंथालयामध्ये दोन वर्षासाठी ठेव म्हणून ठेवावीत.** १० पेक्षा अधिक पुस्तके स्वीकारली गेल्यास वर्षभर ग्रंथालयाचे सभासदत्व मोफत मिळेल. अन्य अनेक पुस्तके तुम्हाला मोफत वाचण्यास मिळतील. दोन वर्षांनंतर आपली पुस्तके सुस्थितीत परत मिळतील. आपल्याकडील पुस्तके पडून राहण्यापेक्षा अनेकांना त्याचा फायदा करून देणे निश्चितच अधिक शहाणपणाचे आहे. आपले अनेक सभासद शहाणे असल्याने ते या ठेव योजनेस भरघोस प्रतिसाद देतील अशी अपेक्षा आहे.

## आपल्या गावात ग्रंथालय व्हावे असे आपणास वाटते का ?

तुमच्या मित्र मैत्रिणींकडून विविध विषयांवरील पुस्तके गोळा करा. अशी ५० पेक्षा अधिक पुस्तके गोळा झाली की त्याची यादी (पुस्तकाचे नाव - लेखकाचे नाव - पृष्ठ संख्या - पुस्तक कोणी दिले त्याचे नाव) करून ती आमच्याकडे पाठवा. त्याची एक प्रत तुमच्याकडे ठेवा. ग्रंथालय कसे चालवावे यासंबंधीची माहिती आम्ही तुम्हाला पाठवू. त्याप्रमाणे गंथालयाचे सभासद मिळवून, आहे त्या पुस्तकांनिशी ग्रंथालय सुरू करा. तुमच्या ग्रंथालयाचा नियमित वापर सुरू झाला की एक महिन्याने आम्हाला कळवा.

**तुमचे ग्रंथालय समृद्ध होण्यासाठी आम्ही तुम्हाला निश्चित मदत करू.** अशाप्रकारे तुमच्याही गावात छानसे ग्रंथालय सुरू होऊ शकेल.

ॐ

छात्र प्रबोधन

वर्ष ४ अंक १२
सौर आषाढ, शके १९१८



इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात.

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेंद्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**मुखपृष्ठ आतील चित्रे**
भास्कर सगर

**अक्षर जुळणी**
अक्षय एंटरप्रायजेस ॲण्ड सर्व्हिसेस
५१६ १, नारायण पेठ, पुणे -३०.

**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे - २.

**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ
पुणे-४११०३०
☎ ४७७६९१

**वार्षिक नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII

**प्रकाशन दिनांक**
सौर आषाढ १० शके १९१८
२ जुलै १९९६

**वार्षिक वर्गणी**
रु. १००/-

# अंतरंग

- *संवाद* — २
- *कथा*
  *लालबुंद डोळे* — ३
- *कवितांमधला झिम्माड पाऊस* — ९
- *पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा* — १४
- *डोळस भटकंती*
  *हिरव्या मित्रांचा परिचय* — १७
- *कालिदासदिनानिमित्त*
  *महाकवी कालिदास* — २१
- *अभ्यासातील स्वावलंबन*
  *अभ्यास पायऱ्या - भाग २* — २४
- *अधिक मास का ? तो कोणता ?* — २७
- *स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास*
  *पूर्वेकडचा स्वातंत्र्य सूर्य- भाग ४* — २९
- *मीनाची गोष्ट* — ३५
- *ओळख स्पर्धापरीक्षांची*
  *सैन्यातील प्रवेशासाठी* — ३७
- *सिंहावलोकन चौथ्या वर्षाचे* — ४१
- *कार्यालयीन पत्ते* — ४८

*सुखद, शीतल, पाऊस गारवा, घेउनी आला सुगंधी शिरकावा*

*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो*

*मेमधील मुलींच्या शिबिराचे वृत्त मागच्या अंकात वाचले असेलच. जूनमधील मुलांची शिबिरेही उत्साहवर्धक, वेड लावणारी, लागलेले वेड वाढवणारी झाली. महाराष्ट्र गोवा-दिल्ली येथून एकूण ३५ प्रबोधकांनी नेतृत्व प्रशिक्षण शिबिरांमध्ये, तर महाराष्ट्रातील ८ ठिकाणच्या एकूण ५३० विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरांमध्ये सहभागी होऊन अनेक प्रकारचे समृद्ध करणारे अनुभव मिळविले. तुम्हीही असे अनुभव घेणार ना !*

*छात्र प्रबोधन मासिकाच्या चौथ्या वर्षातील हा शेवटचा अंक ! (किती चटकन वर्ष संपलं नाही !...) गेल्या वर्षभरातील मासिकाच्या वाटचालीचे सिंहावलोकन व विषयसूची शेवटी दिली आहे. असे सिंहावलोकन करत असताना सर्व अंकांमधील 'संवाद' पुन्हा एकदा वाचले. त्यामध्ये प्रसंगानुरूप तुम्हा सर्वांकडून व्यक्त केलेल्या अपेक्षा संकलितपणे या 'संवाद' मध्ये द्याव्यात, छात्र प्रबोधनचा प्रबोधक कसा असावा त्याचे माझ्या मनातील चित्र तुमच्यापर्यंत पोहोचवावे म्हणून साधलेला हा संवाद !*

*छात्र प्रबोधनच्या तुम्ही सर्व सभासदांनी अभ्यासामध्ये उत्तम गुण मिळवायलाच हवेत. पण परीक्षेतील गुण म्हणजेच सगळं काही असे मानण्याची चूक करू नये. विविध अभ्यासतंत्रांचा व नियोजनाचा वापर करून, अभ्यासाबरोबर उत्तम व्यायाम व खेळासाठीही आठवड्यातून २-३ तास वेळ जरूर द्यावा.*

*शाळेच्या विविध कार्यक्रम-स्पर्धा-संमेलन इ. मध्ये हिरिरीने, जबाबदारीपूर्वक सहभागी व्हावे. विविध सार्वजनिक उत्सवांमध्ये समाजात मिसळून अनेकांबरोबर काम करण्याची संधी घ्यावी.*

*स्वत:च्या क्षमता, कौशल्य वाढविण्यासाठी अन् स्वत:ला जे येतं ते अनेकांना (ज्यांना ते शिकण्याची संधीच कधी मिळाली नाही अशांना) शिकविण्यासाठी छात्र प्रबोधनद्वारा आयोजित विविध प्रासंगिक व नित्य उपक्रमांमध्ये सहभागी व्हावं. मासिकातील लेखांचे वाचन व त्यावर विचार-चर्चा-कृती करावी.*

*प्रबोधिकांनी सर्वार्थाने समर्थ होण्याचा संकल्प करावा अन् प्रबोधकांनी समानतेच्या नात्याने, निकोप दृष्टिकोनातून त्यांच्या विकास प्रक्रियेतील अडथळे दूर करावेत. ग्रामीण जीवनाशी समरस होण्याचा, त्यांची सुखदु:खे समजून घेण्याचा प्रयत्न करावा. देशाला लागलेले विविध प्रश्नांचे ग्रहण समजावून घ्यावे व त्यातून देशाला बाहेर आणून वैभवसंपन्न करण्याचा निश्चय करावा.*

*असं करायचं ठरवलं तरी गंभीर चेहऱ्याने वावरायचं कारण नाही. मनसोक्त, मोकळेपणाने हसावं, हसत राहावं. अनेकांना हसत ठेवावं. बाल किशोरवयातील निखळ आनंद मिळवावा. हट्ट करावेत, खोड्या काढाव्यात. बंड करावे, भांडणे करावीत, मस्ती करावी, मोठमोठी स्वप्न पाहावीत अन् 'भारताचे उज्ज्वल भविष्य आम्ही घडविणार आहोत' असंही म्हणावं.*

*छात्र प्रबोधनला तुमच्या या वाटचालीत दीर्घकाळ सोबत करायला आवडेल. छात्र प्रबोधनचे असे खरे प्रबोधक होण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !*

सस्नेह तुमचा

**(महेंद्र सेठिया)**

***देवा, पाऊस पाऊस, तुझ्या डोयातले आंस । दैवा, तुझा रे हारास, जीवा तुझी रे मिरास ।।***


# लालबुंद डोळे

■ विनाद वेडेकर

जयपूर नरेशांच्या प्रासादातील नवगजी सजली होती. त्यात उजेडाचा लखलखाट होता. वरील छत नेत्रांना थंडावा देणारे होते. मासे आणि कासवे यांची चित्रे काढलेला रुजामा अंथरलेला होता. छतावरून लटकावलेली हंड्याझुंबरे लखलखत होती. पडद्यांवरच्या घंटा किणकिणात होत्या. लोकांच्या नजरा भिरभिरत होत्या. चांदण्याची अब्दागिरी चमचमत होती.

तलवारीच्या मुठीवर हात ठेऊन धीरोदात्तपणे जयपूरनरेश ईश्वरसिंगाने नवगजीत प्रवेश केला. दरबारातील सर्वांचे मुजरे घेत शांतपणे तो सिंहासनाकडे जात होता. गव्हाळ वर्णाचा उंचापुरा ईश्वरसिंग तख्ताला पाय न लावता अलगदपणे सिंहासनावर बसला. अख्ख्या नवगजीत त्याच्या नावाचा जयजयकार झाला. त्याच्या मस्तकावर अब्दागिऱ्या शोभू लागल्या. चवऱ्या ढळू लागल्या.

दरबाराच्या कामकाजासाठी दिवाण केशवदास पुढे झाला. हा पिढीजाद दिवाण आयामल्ल किंवा मलजींचा मुलगा होता.



*आता जगू दे रे शेतं, आला पाऊस पाऊस, वऱ्हे येऊ दे रे रोपं, आता फिटली हाऊस.*

मलजीच्या मृत्युनंतर केशवदास दिवाण झाला होता.

"मरहट्टोंकी हकीकत क्या हैं केशव ?" ईश्वरसिंगने विचारले.

"मरहट्टे पैसा मांग रहे हैं, हुजूर !"

"कितना पैसा ?"

"चौबीस लाख, हुजूर !"

"हां ऽऽऽ ! यह तो हमनेही तय किया था, लेकिन वो हालात कुछ अलग थे ।"

"हां हुजूर, लेकिन मल्हारराय होलकर हमसे सख्त नाराज हैं ! जबसे नारायणदासने खंडेरायका कत्ल किया था वही दिनसे हमसे बदला लेनेका ऐलान किया है !"

"अच्छा तो यह बात है, ठीक है. केशवजी, आपका क्या खयाल है ?"

"हुजूर मैं क्या कहूँ ? जो आपको मंजूर हो वोही तो करना होगा ।"

"हाँ मैं यहीं सोच रहा था । आपका और वह मल्हारराय मकहुर का याराना जैसा बढ रहा है, वै देखकर हम भी कुछ करनेका सोच रहे है !"

ईश्वरसिंगच्या या वाक्यानंतर दरबारात एकदम सन्नाटा पसरला. मल्हारराव होळकराशी या केशवदासची सलगी अलीकडे वाढली होती हे खरे, परंतु हा पिढीजात दिवाण जयपूरच्या गादीच्या विरुद्ध काही करेल असे कोणाच्याही मनात आले नव्हते. पण ईश्वरसिंगाच्या मनात काहीतरी भलतेच होते ! त्याला कारणही तसेच होते. हरगोविंदरायाने ईश्वरसिंगाचे कान फुंकले होते. दिवाण केशवदास आतून मराठ्यांना सामील आहे अशी खोटीच माहिती त्याने ईश्वरसिंगाला सांगितली होती. वरून शांत असलेला ईश्वरसिंग आतून ज्वालामुखीसारखा खदखदत होता. तो अंगार कधीतरी विस्फोटाने बाहेर पडणार होताच.

"केशव" ईश्वरसिंग कडाडला ! "मल्हारराय क्या देनेवाला है तुम्हे, हमारे खिलाफ कारवाई करनेका ? टोडा परगना ? टोके परगना ? बोलो, बोलो ।"

"हुजूर, ऐसा कुछ भी नही है । हमने आपके खिलाफ ऐसा कोई काम नहीं किया जिससे आपको कुछ अपाय हो । हम मुद्दतोंसे इस गद्दीका काम निभाते आये हैं । आजतक किसीने इस गद्दीसे बेईमानी नहीं की हैं हुजूर."

"ये बात है केशव, तो वचन दे सकते हो ? क्या और कैसा वचन देना है यह हम बताएंगे ।"

"हम अवश्य वचन देंगे हुजूर, हमने कोई बेईमानी नहीं की हैं ।"

"तो ठीक है ! हरगोविंद, बुलावो उस सपेरेको ।"

दरबारात एकदम शांतता पसरली. ईश्वरसिंगाने एकदम गारूड्यालाच बोलविण्यास सांगितले होते. हरगोविंद तातडीने बाहेर जाऊन परत आला. त्याच्यासोबत एक फाटक्या अंगाचा गारुडी होता. त्याने डोईवर मुंडासे बांधले होते. गळ्यात मण्यांची माळ होती. कमरेखाली

मळके वस्त्र होते. वरती छाती उघडीच होती. एवढा मोठा दरबार पाहिल्यावर तो दरवला होता.

''आओ, आओ सपेरे, क्या नाम है तुम्हारा ?'' ईश्वरसिंगाने विचारले,

''अच्छा बनवीर, क्या लाए हो ? जरा बताओ तो ।''

बनवीराच्या हातात एक टोकरी होती. एका खांद्यावर दोऱ्याला बांधलेली पुंगी लटकत होती. अत्यंत सावकाशीने त्याने हातातली टोकरी खाली ठेवली. दुसऱ्या हाताने खांद्यावरची पुंगी खेचली. थरथरत्या हाताने त्याने टोकरीवरचे झाकण बाजूला केले.


दरबारात विलक्षण शांतता पसरली होती. जो तो भान विसरून त्या टोपलीत पाहत होता. त्या टोपलीत एक काळाकुट्ट नाग होता. गारुड्याने पुंगीने ढोसताच तो काळा, जहरी नाग एकदम फूत्काराला,

''फुस्स ऽऽऽऽ!'' त्या आवाजाबरोबरच दरबारात असलेल्या प्रत्येकाच्या मनात चर्र झाले.

''फुस्स ऽऽऽऽ!''

नाग आवाज काढतच होता. त्याबरोबर तो जागेवरच उभा राहत होता. त्याचा पसरलेला फडा वरवरच जात होता. टोपलीतून दोन अडीच फूट उंचावर तो तळपत होता. नागाचे डोळे लालबुंद होते. जीभ वळवळत होती. फड्यावर दहाचा आकडा होता. म्हणजे पांढऱ्या रंगाची दोन वतुळे होती.

बनबीराने परत त्या नागाला डिवचले. ''फुस्स ऽऽऽऽ'' परत फूत्कार वातावरणात घुमला.



*निथळती झाडे, फुलपंखी पाने, हिरवाई गाणे ।*

''कितना जहरी है यह नाग, बनवीर ?'' ईश्वरसिंगाने विचारले

''बस हुजूर, अगर इसने काँटा तो आदमी पानी तक नहीं माँगेगा ।''

''यह बात हुई ना ! केशवदास !'' ईश्वरसिंगाचा आवाज दरबारात घुमला. ''केशवदास, अगर तुमने हमारे खिलाफ कोई बेईमानी नहीं की है तो वही इस नागके सरपर हाथ रखके कहो ।''

दरबार अवाक् झाला. काहीतरी विलक्षण घडणार हे कळल्यावर सगळ्यांच्याच अंगावर सर्रकन् काटा आला.

केशवदास शांत उभा होता. काय होणार हे त्याला दिसत होते. साक्षात मृत्यू समोर उभा होता. पण त्याचे मन विचलित झाले नव्हते.

''हुजूर, मैं फिर दोहराता हूँ । हमने कोई बेईमानी नही की है । आप यही चाहते है तो वही सही । जय एकलिंगजीकी !'' असे म्हणत केशवराज पुढे झाला. त्या काळ्या जहरी नागाच्या मस्तकावर त्याने हात ठेवला. हात ठेवला न ठेवला तोच तो नाग त्याला डसला.

''आँ ऽऽऽऽ'' केशवदास कळवळला. पण नागाने आपले काम चोख केले होते. डसल्यावर तो टोपलीतच दबून बसला. गारुड्याने तत्काळ टोपलीचे झाकण लावले.

इकडे केशवदास खाली कोसळाला. वेदना त्याच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. ओठांवर फेस जमू लागला होता. हातपाय वळू लागले होते. काही क्षणातच खेळ खलास झाला. ईश्वरसिंगाने दरबार बरखास्त केला....

जयपूरचे कछवाह आणि नानासाहेब पेशवे यांचा संघर्ष बऱ्याच काळापर्यंत चालला होता. इ.स.१७४३ मध्ये सवाई जयसिंग मरण पावला. त्याला दोन मुलगे होते. वडील ईश्वरसिंग आणि धाकटा माधवसिंग. माधवसिंग हा मेवाडच्या राजकन्येचा असल्याने एका करारानुसार या जयपूरच्या गादीवर त्याचा हक्क होता. पण ईश्वरसिंगाने जयपूरची गादी ताब्यात घेऊन राज्यकारभार चालवला. उदेपूरच्या राण्याने माधवसिंगाला मदत करून ईश्वरसिंगाशी युद्ध आरंभले. शिंदे आणि होळकर या पेशव्यांच्या सुभेदारांनी आपापल्या मतलबासाठी कधी ईश्वरसिंगाचा तर कधी माधवसिंगाचा पक्ष घेतल्यामुळे एकूण सावळा गोंधळच माजला होता. त्यांची मदत घेऊन ईश्वरसिंगाने माधवसिंगाचा पराभव केला होता. परंतु पुढे मल्हाररावाने माधवसिंगाला मदत करावयाचे ठरवले. बुंदीचा उमेदसिंग हाडा त्यांना सामील झाला. राजमहालाच्या रणभूमीवर, माधवसिंग-मल्हाररावाचे सैन्य आणि जयपुराहून आलेल्या हरगोविंददास आणि नारायणदास यांचे सैन्य यात जोरदार रणधुमाळी झाली. टिपरी जैसी सिंमगियाची दणाणते तैसा ररसंग्राम झाला. दुर्दैवाने या लढाईत मल्हाररावाचा पुत्र खंडेराय

होळकर ठार झाला. नारायणदासने त्याला मारले. युद्धात ईश्वसिंगाला जय मिळाला. जयनगरवाल्यांची अस्मानी फत्ते झाली. महाराणा आणि मल्हाररावांचा सपशेल पराभव झाला. राणा नाराज झाला. मल्हारराव बेभान झाला.पुत्रशोकाने तो वेडपिसा झाला. सूडाच्या कल्पनेने त्याला घेरले. त्यात शिंद्यांनी ईश्वरसिंगाची बाजू घेतली. मल्हारराव तर राण्याबरोबरच होता. शिंदे आणि होळकर यांच्या परस्परविरोधी पत्रांनी नानासाहेब पेशव्यांच्या पुढेही कळेनासे झाले.

इकडे मल्हाररावाने सैन्याची जमवाजमव सुरू केली. ईश्वरसिंगाचा मृत्यु हे मल्हाररावाचे एकमेव ध्येय ठरले. त्याने एक पत्र पेशव्यांस पाठवले. ''राणाजीकडून किशोर पंचोली व जयसिंग सखतावत पिंपळेकर या उभयातास श्रीमंताचे दर्शनानिमित्त पाठविले आहेत. माधोसिंगाकडून कणीराम विदीत करतील. यांच्या आपल्या मते मनास आणून कर्तव्य ते करावे. श्रीमंताचे आज्ञेनुसार वर्तणूक करू.''

नानासाहेबांनी हे पत्र वाचले. मंडळीची भेट घेतली. पण गुंता सुटला नाही. शेवटी स्वत: पेशवेच उत्तरेकडे निघाले. त्यांनी माधवसिंगाची भेट घेतली. मल्हाररावांचीही घेतली.

''मल्हारबा, ईश्वरसिंग काय म्हणताहेत ?''

''श्रीमंत, त्यांचे वागणे लटके, बोलणे लटके. चोवीस लाख कबूल करूनही देत नाहीत. आता वेळ आलीच आहे. श्रीमंत आज्ञा करतील तर जयपूर घेतो.''

''मल्हारबा, राजमहालावर काय झाले. पुत्रवियोगाच्या तुमच्या जखमेवर मी मीठ चोळत नाही परंतु राण्यासकट सगळ्यांचा पराभव ईश्वरसिंगाने केला. जयपूर घेणे सोपे नाही.''

''श्रीमंत, जयपूर घेणे अवघड हे खरेच परंतु शिंदे आतून ईश्वरसिंगास मदत करतात. आपले अवघे मनसुबे जयपुरास कळतात.''

''मल्हारबा हा पेच परस्पर वाढलाच आहे. पण आपल्या घरातील सरदारात द्वैतभाव नसावा. परस्पर रुष्टता नसावी. सर्व एकचित करून धन्याचा मनसुबा आणि हित बाळगीत जावे. तुम्ही दौलतीचे स्तंभ तैसेच सिंदेही. आपल्या मर्दुमकीची आणि दिलेरीची सर्वत्र तारीफ करतात. घरकलहामुळे दौलतीच्या कार्यास अटकाव येतो. तरी किल्मिष दूर करावे.''

''श्रीमंत, तसे शिंद्यांसही कळवावे.''

''अवश्य, पण मल्हारबा, जयपुराबाबत सूडबुद्धी नसावी. बोलाने काम झाले तर उत्तम नपेक्षा जे योग्य तेच करावे.''

''आज्ञा श्रीमंत.''

मल्हारराव आपले सैन्य घेऊन जयपुरास निघाले. गंगाधरपंत चंद्रचूड हे निरोप घेऊन ईश्वरसिंगाकडे गेले,

''पेशव्यांच्या हुकूमाने आणि मल्हाररावांच्या वतीने निरोप घेऊन आलो आहे, सरकार.''

''क्या कहते है मल्हारराय?''

''सरकार, चोबीस लाख का तो वचन आपने दिया था ।''

''हाँ दिया तो था लेकिन हालात कुछ और थे और गंगाधरपंत आप राजमहलकी पिटाई भूल रहे है । हमारी फौज खडी है । आप हमपर दबाब डालके कुछ नहीं ले सकते । आप जाइए ।''

ईश्वरसिंग काही द्यावयास तयार नव्हता. गंगाधरपंतांनी हा निरोप आणताच मल्हाररावांनी लढाईची तयारी सुरू केली. जयपूर शहराभोवतालच्या वाड्या जाळल्या. दुसऱ्याच दिवशी ईश्वरसिंगही आपली फौज घेऊन चालून आला. चार घटका प्रचंड युद्ध झाले. दोन्हीकडचे मिळून पाचसहाशे लोक कामास आले. अनेकजण जखमी झाले. दरम्यान शिद्यांची कुमक आली. मराठी फौजचे बळ वाढले. ईश्वरसिंगाचा पराभव दिसू लागला. मैदानातून सफाईने माघार घेतली. आपली फौज घेऊन ईश्वरसिंग जयपुरात गेला. मराठ्यांनी जयपुरास वेढा घातला. मराठी तोफखाना धडधडू लागला. त्या माराने जयपूर विरघळू लागले. दिवसेंदिवस मराठी फौज आत शिरू लागली. रदबदलीसाठी आता शहाणा माणूस जयपूरात राहिला नव्हाता. मल्हाररावाच्या मित्राचा केशवदासचाही बळी ईश्वरसिंगाने घेतला होता. 'केवळ चार लाख रुपये देतो वेढा उठवा' अशा सूचना ईश्वरसिंगाने देऊन पाहिल्या. परंतु मल्हरराचाच्या मनात अंगार पेटला होता. सूडाने तो जळत होता. पुत्रशोकाने तो विव्हळत होता. रागाने खदखदत होता. मला ईश्वरसिंगाचे 'मुंडकं हवय, मुंडकं हवय' असे ओरडत होता.

ईश्वरसिंगाच्या कोणत्याही प्रस्तावास मल्हाररावाने मान्यता दिली नाही. सपेशल शरणागतीचा एकच प्रस्ताव मल्हाररावाने ईश्वरसिंगासमोर ठेवला होता.

ईश्वसिंग हतबल झाला. पराभव समोर दिसत होता. पण पराभवच नव्हे तर विटंबनाही दृग्गोचर होत होती. मराठ्यांच्या हातात आपला देह जिवंत पडता कामा नये असे त्याच्या मनाने घेतले. क्षणाचाही विचार न करता त्याने हाक मारली.

''हरगोविंद''

''हुजूर''

''वो सपेरा आया था, क्या नाम था उसका ?''

(पान क्र. ४७ वर पुढे चालू)

# कवितांमधला झिम्माड पाऊस

■ *गणेश दिघे*

*ऋतू मोहवी ऋतुराज पावसाळा*
*किती आल्हादायक ह्या ओल्या विभ्रम वेळा !*

कवी कुलगुरू कालिदासांनी वर्षाऋतूचं केलेलं हे प्रासादिक कौतुक म्हणजेच पावसाळ्या कवितेचा उगम मानायला हवा. परंतु पावसाची पाहिली कविता अगदी लहानपणीच आपल्याला भेटते ती पूर्वापार चालत आलेल्या बडबडगीतातून,

*ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा*
*पैसा झाला खोटा , पाऊस आला मोठा !*

असं म्हणत 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या खेळत आपल्यापैकी लहानपणी पावसात भिजलाच नाही असा कोणी सापडणे खरंच अवघड आहे. एरव्ही पावसात भिजू नको म्हणणारी आई, पहिल्या पावसात तुम्हाला बाहेर पिटाळते. मग पावसात ओलेचिंब होण्याची गंमत वाटते. गारा पडू लागतात अन् मग काय आनंदाला भरतेच ! मग अगदी उचंबळून येते. ओठावर आणि आभाळावरही नाचू लागते पावसाची कविता–

*नभ मेघांनी आक्रमिले*
*गडद निळे गडद निळे*
*जलद भरून आले*
*शीतलतनु चपलचरण*
*अनिलगण निघाले*

आभाळ गडदनिळ्या सैनिकरूपी ढगांनी भरून गेलंय. हे थंड स्वभावाचे पण चपळ असे वाऱ्याचे सैन्य सफरीवर निघाले आहे. काहीसे अनुपम घडणार हे नक्की ! आणि ह्याचा प्रत्यय आपल्याला येतो कुसुमाग्रजांच्या 'वर्षागमन' ह्या कवितेत. ह्या अनिलगणाकडे कोणाचे काय काय आर्जव आहेत, इच्छा आहेत, अपेक्षा आहेत ?....

*डोह कपारी मधिल काळे,*
*शेवाळ्यातून उचलून गेले*
*बघत केधवा येईल वाहत*
*धावत जीवन धार*
*रित्या नद्या, सुकलेले निर्झर,*
*भकास राने, उदास डोंगर,*
*कृतज्ञतेने बघती श्रवती*
*मेघांचे ललकार.*



**पाण्यातल्या झाडांवर तरंग थेंबाचे, सावल्यांचे पंख ओल्या हळदी उन्हाचे.**

मग चराचराची ही अवस्था पाहून अनिलगण काय करतात माहीत आहे?

*सजल श्याम घन गर्जत आले*
*बरसत आज तुषार*
*आता जीवनमय संसार.*

पावसाच्या जलधारांचा वर्षाव हे अनिलगण धरित्रीवर करतात आणि सारी दृष्टी जरी नवजीवन मिळाल्यागत आनंदी झाली तरी हे सर्व एवढ्या सहज होतं का ? कवी गजानन चोपडे म्हणतात,

*श्यामल घनांनी*
*नभ झाकोळून गेले*
*आला सोसाट्याचा वारा*
*पान पान थरारले.*
*भिडे ढग तो ढगाला*
*मृदंग देवजीचा वाजला*
*लखलखाट करीत*
*अन् चमकती मेखला.*


आता अनिलगण युद्धास निघाले म्हटल्यावर विजा तर चमकणारच पण पावसात भिजायच्या हौसेला विजांची भीती कशी वाटेल. अज्ञात कवीच्या एका कवितेत म्हटलंय

*टपटप पटपट थेंब टपकती*
*सरसर झरझर धारा येती*
*मुसळधार या सरी कोसळती*
*त्या झेलाया अंगावरती*
*अंगणात जाऊ या,*
*पावसात या भिजू या.*

आता पावसात भिजून आपलं थोडं भागतं ? नाना प्रश्न पडतात आपल्याला, गारा कोठून येतात, जमिनीवर कुठेही न दिसणारी बीजं, रोपं होऊन कशी हिरवळतात, अगदीच काही नाही तर पंखवाल्या मुंग्या आणि बेडूक अचानक कसे पुढ्यात उभे ठाकतात ? मग हीच कोडी सोडवण्यात आपण गुंततो.

*जिकडे तिकडे तळी तुंबली*
*बेडूकसेना कोठून आली*
*काल पावेतो कोठे होती*
*डरॉव डरॉव बिगुल वाजती*
*बेडूक किती ते मोजू या,*
*पावसात या भिजू या*

आणि अचानक पाऊस तुमच्या



आमच्याशी गट्टी फू ऽऽ कट्टी फू ऽऽ खेळतो. अंगणात आपण पाऊसगाणी पढत असतो आणि पाऊस येणंच बंद होत अशा वेळी कविवर्य ‘विंदा’ करंदीकर गंमतीने काय म्हणतात पाहा.

*ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा,*
*पैशाचा घे खाऊ दूर नको जाऊ.*

कवितेतलं हे तुमच्या-आमच्या सारखं बाळ पावसात पैसे देऊन पडायची विनंती

करतं, पाऊस काही पडत नाही. मग हे बाळ चिडतं आणि आपलंही गाणं फुकट नाही अस्सा सज्जड दम भरतं पावसाला.

*येरे येरे पावसा*
*डोंगर तुझा मावसा*
*टाक सगळी नाणी*
*फुक्कट नाही गाणी.*

पावसाळा सुरू झाल्याच्या खाणाखुणा आभाळात दिसू लागतात आणि बालकविंना सौंदर्याचा साक्षात्कार होतो. ती कविता तर सगळ्यांनीच केव्हा ना केव्हा गुणगुणली आहे.

*थबथबली ओथबूंन खाली आली*
*जलदाली मज दिसली सायंकाळी*
*रंगही ते नच येती वर्णायाते*
*सुंदरता मम त्याची भुलवी चित्ता.*

बस्स! आपल्याही डोळ्यासमोर नाचू लागतात हिरव्या हिरव्या गार गालीच्यांनी नटलेली निसर्गचित्रे. पाऊस असाच झरझरत राहतो. ढग पाहून लहान मुले कल्पनेत रंगून जातात. त्यांना कधी ढगात पांढरा हत्ती, काळे मांजर, वाघ, जिराफ असे काहीसे दिसू लागते. कवयित्री संजीवनी बोकिलांना तर चक्क तुमच्यासारखा छकुलाच दिसला.

*काळाकुट्ट मोठ्ठा ढग*
*फिरूनी आला सारे जग*
*पाहूनी घेतले नाना देश*
*वेगवेगळे त्यांचे वेश*
*हिरवी झाडे समुद्र निळे*
*सारे जग त्यास पहाया मिळे*
*वाटेत मोठ्ठा डोंगर आला*
*'तिकिट पाहू ' असे म्हणाला.*
*ढग गेला पार घाबरून*
*डोळ्यात पाणी आले भरून*
*ढसाढसा रडू लागला*
*लोक म्हणाले, 'पाऊस आला.'*

असे ढग पाहून बालकविंच्या मनात कोणती निसर्ग चित्रे उतरली असतील बरे !....

*फिक्कट निळीने रंगवलेला कापूस मेघांचा*
*वरूनी कुणी गुलजार फिरवला हात कुसुंब्यांचा*
*त्यातही हसली मंदपणे ती चंद्रकाला राणी*
*कडेकडेच्या मेघांवर ये मोत्याचे पाणी.*
*इंद्रनिळीचा रंग बहरवी गिरीच्या अंगाला*
*मधुन जळाची शुभ्र शोभवे ती मोहनमाला*
*चौबाजूला थाट दाटला हा हिरवळीचा*
*सृष्टी सतीने साज घेतला पाऊसकाळीचा.*

विदर्भातल्या आपल्या बहिणाईंना हा पाऊस कसा भावला ठाऊक आहे ?

*आला पह्यला पाऊस*
*झिपडली भूईसारी*
*धरित्रीचा परिमय*
*माझं मन गेलं भरी.*
*आला पाऊस पाऊस*
*आता सरीवर सरी*
*शेत शिवार भिजले*
*नदी नाले गेले भरी.*
*आला पाऊस पाऊस*
*आला ललकारी ठोकत*
*पोरं निघाले भिजत*
*दारी चिल्लाया मारत.*

आता पावसाची संततधार सुरू होते.पाऊस अहोरात्र कोसळत राहतो. घराबाहेरही पडू देत नाही आाणि एके दिवशी सकाळ चक्क सोनेरी उन्हानेच उजाडते. अरे ऽऽ हा तर श्रावण !

*श्रावण आला हा श्रावण आला !*

*प्राजक्त नाजूक सुगंध साजूक*
*उधळी उषेच्या वेळा श्रावण आला !*
*हिरव्या रानात पाण्याच्या मनात*
*सुगंध भरून गेला, श्रावण आला.*

(अज्ञात कवि)

*श्रावणमासी हर्ष मानसी*
*हिरवळ दाटे चोहिकडे*
*क्षणात येते सरसर शिरवे*
*क्षणात फिरूनि उन पडे*

(बालकवि)

*स्फटिक जळातून हासत खिदळत*
*आला श्रावणमास*
*दिशादिशांना उधळीत फुलवित*
*हृदयी हिरवी आस*
*जलवंतीच्या घेवून झाऱ्या*
*मेघ अंबरी घालीती फेऱ्या*
*क्षणभरी करिती नाजूक चाळा*
*क्षणात वर्षाभास*
*आला श्रावणमास !*

(सरोजकुमार जाधव)

*आला आषाढ श्रावण,*
*आल्या पावसाच्या सरी.*
*किती चातक चोचीने,*
*प्यावा वर्षाऋतू तरी.*

(बा.सी.मर्ढेकर)

श्रावणात पावसाची अशी एकूण रेलचेल चालू असते. आभाळात ढग येतात, बरसतात, पुन्हा सोनसकाळी कोवळे उन पडते आणि एके सायंकाळी...

*धामधूम पावसाची पाहूनिया सारी*
*उन्हे आवरोनी गेले सूर्यदेव घरी*

(कुसुमाग्रज)

अशी अवस्था होते. ही उन्हं जातात आणि रात्रभर धुवांधार पाऊस कोसळत राहतो. दिवे जातात. आपल्याला तर सकाळी लवकर शाळेला जायचं असतं. अंगणात, रस्त्यावर पाणीच पाणी झालेलं असतं. मनातून वाटत असतं शाळेभोवती 'तळे साचून सुट्टी मिळेल काय?' शाळेत गेल्यावर आज शाळेला सुट्टी ! मग काय !

*अवचित आला पाऊस घेऊन*
*सुट्टीची नोटिस*
*आलजिब्र्यातून*
*जसे पडावे*
*मोराचे पीस.*

(आ.ना.पेडणेकर)

असा हा मोराचं पीस मनावरून धिरवणारा पाऊस. त्याचे मोहवून टाकणारे नाना प्रमाद, प्रताप, कला, विभ्रम सुष्टीतल्या प्रत्येकालाच हवेहवेसे वाटतात. ह्या ऋतुराज पावसाच्या आणखीही भरपूर कविता, गाणी आहेत. तुम्हीही तुमच्याकडे पावसावरच्या वेगवेगळ्या कविता, गाणी यांचा संग्रह करायला सुरुवात करा. त्यातल्या तुम्हाला भावलेल्या १-२ कविता त्यांच्या कवींच्या नावासह लिहून आमच्याकडे पाठवा. त्या मासिकातून आपण अनेकांपर्यत पोहोचवू.

बाहेर पाऊस पडतोय का ? मग तुम्हीही करा की पावसावर एक छानशी कविता. अगदी चार ओळी लिहिल्यात तरी चालेल. पण ह्या मनोहर पावसावर काहीतरी लिहाच.


(या लेखातील कोणतीही कविता तुम्हाला हवी असेल तर एका कोऱ्या पाकिटावर तुमचं नाव-

***पाऊस आला वारा आला पान लागले नाचू, थेंब टपोरे गोरे गोरे भरभर गारा वेचू.***

पत्ता लिहून त्याला १ रुपयांचे तिकिट लावा व पाकिटाच्या आत एका कवितेसाठी ५० पैशांचे तिकिट यांप्रमाणे पोस्टाची तिकीट मुख्य पाकिटात घालून ते छात्र प्रबोधनाच्या पत्त्यावर पाठवा. तुम्हाला कोणती कविता हवी आहे हे कळवायला मात्र विसरू नका. आम्ही तुम्हाला हव्या असलेल्या कविता संपूर्ण लिहून पाठवू.)

करून तर पाहा

## शिट्टी आणि नरसाळे



विशिष्ट प्रकारचा आवाज काढीत भर गर्दीतून वेगाने जाणारे आगीचे बंब अथवा रुग्णवाहिका तुम्ही नक्कीच बघितल्या असतील. काय वैशिष्टय़ असतं या आवाजाचं ? ही महत्त्वाची वाहने 'सायरन' वाजवीत जातात म्हणजेच हा आवाज विशिष्ट प्रकारे कमी-जास्त होत असतो. असा 'सायरन' आपल्याला घरीच ऐकता येईल का ?

**आवश्यक साहित्य :** शिट्टी, नरसाळे व दोरा

सर्व प्रथम शिट्टीचं टोक नरसाळ्याच्या नळीत घट्ट बसवा. आता दोऱ्याचे एक टोक नरसाळ्याला तर दुसरे दोऱ्याचे एक टोक नरसाळ्याला तर दुसरे टोक शिट्टीला बांधा.

आता हे उपकरण गोल-गोल फिरवले तर शिट्टी वाजते. नरसाळ्यातून शिट्टीत दाबल्या जाणाऱ्या हवेमुळेच ही शिट्टी आवाज करते.

आता तुमच्या एका मित्राला हे उपकरण जमिनीला समांतर ठेवून फिरवायला सांगा आणि तुम्ही मात्र बाजूला उभे राहा. आता काय ऐकू येतं ?

तुमच्या जागेवर शिट्टीचा आवाज ऐकू येताना 'सायरन' प्रमाणे त्यात चढउतार जाणवतील. (यालाच डॉपलरचा परिणाम म्हणतात.) परंतु तुमच्या मित्राला मात्र नेहमीसारखी साधीच शिट्टी ऐकू येईल -असं का बरे ? प्रयोग करून पाहा आणि उत्तर कळवा.

■■

*पावसात न्हाली माती - भिजले डोंगर, मोहरली पृथ्वी सारी - पालवले पत्थर ।*

## पाठ्यपुस्तकातील

# प्रतिज्ञा

■ प्रा. शैलजा देशमुख

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

जून महिना उजाडला. नवे शैक्षणिक वर्ष, नवा वर्ग, नवा गणवेश आणि नवी पुस्तके ! नवीन पुस्तकाचं पहिलं पान उघडलं की तिथे ओळखीचा मजकूर दिसतो. तो म्हणजे पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा ! शाळेत घंटा होते; प्रार्थना होते. आणि हजारो गळ्यातून ही प्रतिज्ञा उमटते –''**भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.**'' कधी या प्रतिज्ञेचा मथितार्थ समजावून घेण्याचा प्रयत्न केलाय ? श्री. यदुनाथ थत्ते यांनी 'प्रतिज्ञा–पाठ्यपुस्ताकील' या नावाची एक सुंदर पुस्तिका लिहिली आहे. तिच्या आधाराने हा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करू या.

लेखक म्हणतात–'**प्रतिज्ञा म्हणजे काया–वाचा–मनाने केलेला संकल्प ! या संकल्पात निर्धार, निष्ठा आणि श्रद्धा असते. प्रतिज्ञा म्हणजे एखाद्या सत्कार्यासाठी करावयाच्या निर्धाराचा घनगंभीर पुनरुच्चार !**' हे व्हायला हवे असेल तर तिचा अर्थ आपल्या मनापर्यंत पोहोचायला हवा.

प्रतिज्ञेचे पहिले वाक्य आहे–'**भारत माझा देश आहे.**' या वाक्यातील 'माझा' हा शब्द देशाविषयी आत्यंतिक जवळीक, प्रेम दाखवतो. हे प्रेम काया–वाच–मन सर्वार्थाने व्यक्त व्हायला हवे. आपल्या मनापुढे वास्तवातील विकलांग भारत आणि उद्याचा आदर्श भारत उभा राहिला पाहिजे. प्रतिज्ञेच्या दुसऱ्या वाक्यात आपण म्हणतो, '**सारे भारतीय माझे बांधव आहेत.**' या वाक्यात 'स्त्रिया, दीन, दरिद्री, विकलांग, निराधार, निरक्षर असे सर्वजणही माझे बांधव आहेत. त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची तळमळ मनात हवी' ही जाणीव जागी करण्याचा प्रयत्न आहे. समाजात अनेक तऱ्हेचे अन्याय, दास्य, विषमता आणि वैर–विद्वेष आहेत. अनेकांना त्यामुळे कष्ट भोगावे लागतात. या सर्वांची कारणे समजून घेऊन त्यांच्या निवारणार्थ झटण्याची मनोवृत्ती जोपासली गेली पाहिजे. भारत एकात्म, संपन्न आणि सबल व्हायचा असेल तर न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणा यांच्या आधारे या समाजाची पुनर्रचना करायला हवी. म्हणूनच आपल्या मनात ही भावना ठसायला हवी की सारे भारतीय माझे बांधव आहेत !

'**माझ्या देशावर माझे प्रेम आहे.**' असे म्हणून आपण आपल्या देशावरील प्रेम व्यक्त करतो. देशावर प्रेम म्हणजे भारतभूमीवर प्रेम आणि भूमिपुत्रांवरही प्रेम. प्रेम करायचे म्हणजे दुसऱ्याचे दु:ख पाहून ओल्या डोळ्यांनी त्याच्या मदतीसाठी धावून जायचे आणि

दुसऱ्याला आनंद झाला की आपणही आनंदित व्हायचे. प्रेम करायचे तर अश्रू आणि हास्य यांची भाषा आपल्याला आली पाहिजे. देशावरचे आपले प्रेम प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत दिसून आले पाहिजे. मोठे प्रश्न उभे राहतील तेव्हा तर प्रेम आपण दाखवूच. पण रोज येणाऱ्या छोट्या प्रसंगातून ते सहजपणे व्यक्त व्हायला हवे. आपले देशावरील व देशबांधवावरील प्रेम प्रकट करण्यासाठी संकटांना निमंत्रण देण्याची गरज नाही.

खरोखरच आपल्या देशावर आपले प्रमे असते तर आपली गावे अशी अस्वच्छ, दीनवाणी दिसली असती का ? आपले डोंगर उघडे बोडके दिसले असते का? 'सस्यश्यामला माता' असे काय फक्त राष्ट्रगीतातच घोषवायचे की ती भूमी सस्यश्यामला व्हावी म्हणून आपला घाम गाळायची तयारी ठेवायची? देशावर प्रेम करायचे तर देशाचे आजचे चित्र बदलण्यासाठी कंबर कसायला हवी. माझ्या देशावर माझे खरेखुरे प्रेम असेल तर देश प्रदूषणाच्या कचाट्यात गवसू नये यासाठी मी खटपट करायला नको ? इथली हवा, पाणी, निसर्ग बिघडवून टाकल्यामुळे आपल्या देशावरील आपले प्रेम सिद्ध होईल काय? 'सुजला' म्हणून या देशाचे वर्णन राष्ट्रगीतात आहे. पण प्रत्यक्षात स्वच्छ पाण्याची विहीर नसणारी गावे हजारोंच्या संख्येने आहेत. ही स्थिती बदलण्यासाठी आपण प्रयत्न करायला नकोत ?

माझ्या देशावर माझे खरेखुरे प्रेम असेल तर त्या 'वंदे मातरम्' गीतात जो आदर्श रंगवला आहे, ती वास्तवात यावा यासाठी धडपण्याची प्रेरणा आपल्याला मिळायला हवी. स्वातंत्र्य, समता, आपलेपणा याची हमी प्रत्येक समाजघटकाला देता आली पाहिजे. **'माझ्या देशावर माझे प्रेम आहे'** हे वाक्य उच्चारताना एवढ्या सगळ्या जाणिवांचा कल्लोळ मनात उठला पाहिजे. बेचैन करणारा नवनिर्माणक्षम कल्लोळ !

प्रतिज्ञेतील चौथ्या वाक्यात म्हटले आहे – **'माझ्या देशातील समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.'**

परंपरा चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रकारच्या असतात. ज्यामुळे न्यायाच्या कक्षा विस्तारतील त्या परंपरा चांगल्या. अभिमान बाळगायचा म्हणजे त्या विशुद्ध परंपरांप्रमाणे वागायचे. अभिमान वाटतो असे ज्या गोष्टीबद्दल आपण म्हणतो ती गोष्ट आपण स्वत:च करायला तयार नसलो तर त्या अभिमानाला काहीच अर्थ नाही. काळ बदलेल त्याप्रमाणे जुन्या, चांगल्या परंपरांचे रूपांतर करून नव्या परंपरा निर्माण करायला हव्यात. त्याप्रमाणे वागायला हवे.

प्रतिज्ञेतील पाचवे वाक्य आहे **'त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन'**,–

काळाबरोबर जुन्या परंपरांना उजाळा मिळतो. नव्या परंपरा रुजतात, रुळतात. अशा नव्यानव्या निकोप परंपरा, तुम्हालाही निर्माण करता येतील. त्यांचे पाईक बनता येईल. राष्ट्रीयता, लोकशाही, जातिधर्मातीत वृत्ती, समता आणि विज्ञानाभिमुखता वाढेल अशा परंपरांचे आपण पाईक बनायला हवे आणि एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की समृद्ध आणि विविध परंपरांचे पाईक व्हायचे ते एकट्या दुकट्याने नव्हे, समुदायाने व्हायचे.

**'मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन'** असे प्रतिज्ञेच्या सहाव्या वाक्यात आपण म्हणतो. याचा अर्थ असा नव्हे की मोठ्या माणसांच्या सर्वच गोष्टी अंधपणाने मानाव्यात. वेदकाळात गुरू आपल्या विद्यार्थ्यांना उपदेश करीत खरे बोल, नीतीने वाग, अभ्यासाबाबत हयगय करू नकोस. आमच्या वागण्यातले जे जे चांगले त्याचे अनुकरण कर. इतर गोष्टी टाकून दे. आई-वडील, गुरुजन, वडीलधारे यांच्या वर्तनाची चिकित्सा करा. याचा अर्थ उद्धटपणे वागा असा नव्हे. पालकांचा, गुरुजनांचा, वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवायचा हा एक अमूर्त विचार आहे. त्यांची सेवा करण्याने या विचाराला मूर्त रूप प्राप्त होईल. मतभेद असेल तरीही वागण्यात सौजन्य हवेच, म्हणून हा मंत्र मनात जपा-**'मोठ्यांचा मान ठेवीन. प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.'**


**'माझा देश आणि देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.'** प्रतिज्ञेत एक प्रकारची बांधिलकी असते. पण त्यात सक्ती असू शकत नाही. आपल्या अंतर्यामीला साक्ष ठेवूनच प्रतिज्ञा घ्यायची असते. छोटे निश्चय करून पार पाडत मोठ्या निश्चयांकडे वळायचे. अगदी रोज सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे इथपासून सुरुवात करून तुम्ही पुढे जाऊ शकता. हळूहळू तुमच्या निष्ठेचे क्षितिज विस्तारू द्या **'माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखीन'** या प्रतिज्ञेपर्यंतचा प्रवास रोजच्या वर्तनातून व्हायला हवा.

प्रतिज्ञेचे शेवटचे वाक्य आहे, **'माझा देश आणि देशबांधव यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.'** स्वत:ची वैयक्तिक सुखे, कल्याण यापासून दूर जाऊन आपल्या देशबांधवांच्या सौख्याचा विचार जेव्हा आपल्या ध्यानीमानी रुजेल तेव्हा 'मानवांचे महातीर्थ' असणाऱ्या भारताच्या मानवाच्या ह्या महासागरतीरावर आपण हळूहळू जागे होऊ आणि 'सुजलाम् , सुफलाम् ' अशा भारतभूचे स्वप्न साकार करणारे सुजाण नागरिक आपण बनू. आदर्श नवसमाजाचे स्वप्न साकार होईल.

■■

**डोळस भटकंती**

# हिरव्या मित्रांचा परिचय



■ प्र. के. घाणेकर

**पा**वसाळा सुरू झाला, की अवघ्या सृष्टीची रयाच बदलते. वैशाख वणव्यात भाजून निघालेला परिसर पडणाऱ्या पावसाच्या थेंबागणिक सुस्नात होतो. डोंगरावर हिरव्या झुली पांघरल्या जातात. विस्तीर्ण माळरानं अन् पठारंही मऊ लुसलुशीत हिरव्या गवतानं आच्छादली जातात. त्यामध्ये विविध रंगांची, आकारांची, उंचीची रानफुलं नक्षी काढतात. डोंगरकड्यांवरून पडणाऱ्या तात्पुरत्या धबधब्यांच्या आश्रयाने देखील वनस्पती आपापले संसार थाटतात. या अल्पजीवी, देखण्या वनस्पतींमध्ये काही फुलझाडं असतात, काही फर्नस् म्हणजे नेचे तर काही शेवाळ किंवा चक्क बुरशी म्हणजे अळिंबाचे प्रकार असातत. याच काळात काही भू आमरी म्हणजे जमिनीवर उगवणाऱ्या ऑर्कीडस्नी आपापले संसार थाटलेले असतात.

पाऊस संपून वातावरणातील दमटपणा शिल्लक असतो. याच काळात म्हणजे गौरी-गणपतीच्या आसपास आजूबाजूच्या दाट जंगलात गेलं तर किती तरी झुडंप अन् वेली ऐन बहारात आलेल्या असतात. सह्याद्रीच्या कण्याला धरून असणाऱ्या राजमाची, खंडाळा, भीमाशंकर, हरिश्चंद्रगड, राजगड, महाबळेश्वर, आंबोली अशा खूप जंगल असणाऱ्या ठिकाणी अंधार पडल्यावर रात्री बाहेर पडलं तर काही वनस्पतींच्या खोडांवरून किंवा त्यांच्या गळून पडलेल्या फांद्या-काटक्यांमधून मंद हिरवट निळसर प्रकाश बाहेर पडताना दिसतो. चमकणारे काजवे आपण पाहिलेले असतात पण तेजाळणारी झाडं ! काही वनस्पतींच्या सालीवर वाढणाऱ्या बुरशीमुळे ही जीवदीप्ती त्यांना प्राप्त झालेली असते. तऱ्हेतऱ्हेची विषारी-बिनविषारी भूछत्रे म्हणजे कावळ्या /कुत्र्याच्या छत्र्यादेखील पाहण्याजोग्या असतात.

पावसाळ्यातील ह्या जैववैविध्याचा आपल्याला परिचयच नसतो. ह्यांना काही नावे असतात का ? त्यांचे काही उपयोग आहेत का ? या कशाकशाचा पत्ताच आपल्याला नसतो.

हिवाळ्यात तर मुद्दाम लावलेल्या बागांमधील फुलांचे ताटवे पाहायला नुसती धमाल येते. लहान-मोठी, रंगीबेरंगी-पांढरी शुभ्र, सुवासिक-बिनवासांची अशा या पुष्पसृष्टीचा पुष्पोत्सव पाहणं म्हणजे आनंदाची परमावधी असते. 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' म्हणजे पुष्पघाटीत हजारो लोक

*असा श्रावण लहरी आता सर आता ऊन, रावळात पावसाची घुमे प्रासादिक धून*

ऑगस्टमध्ये अमाप पैसा खर्चून फुलांची वेधक दुनिया पाहायला जातात. आपल्या भोवताली फुलांची दुनिया आपण डोळे भरून पाहावी. त्या फुलझाडांचा परिचय करून घ्यावा, असं आपल्याला वाटतं का?

थंडी संपून नववर्षाच्या स्वागतासाठी जानेवारी, फेब्रुवारी, मार्चमध्ये फुलांची दिवाळी साजरी होते. सोनपिवळ्या फुलांची गणेरी, लालचुटूक मोठ्या फुलांची शाल्मली म्हणजे काटेसावर, शेंदरी पिचकारीच्या फुलांचा गणेरी, लालचुटूक मोठ्या फुलांची शाल्मली म्हणजे काटेसावर, शेंदरी पिचकारीच्या फुलांचा स्पॅथोडिया पिवळ्या धमक फुलांचा सोनमोहोर म्हणजे टबेबुया, गुलाबी अन् किरमिजी फुलांचे टबेबुया, पळस-पांगारा-वड-गुलमोहर यांची रक्तफुले, निळ्या फुलांचा नीलमोहर, पिवळ्या फुलांचे घोस असणारा बहावा, गुलाबी भुईनळ्यांचा कॅशिया रेनीनेरा, महाराष्ट्राचं प्रतीक फूलवृक्ष असणारा जरूल / तामण/ बोंडारा म्हणजे लँगरस्ट्रोमिया, बकुळ-पारिजातक -पिवळा/पांढरा/लाल/ हिरवा चाफा अन् अशाच फुलवृक्षांची ही दिवाळी म्हणजे ऋतुरंगाचे दिवस. फुलांची अन् सुगंधाची उधळण.

म्हणजे सांगायचं कारण असं की कोणत्या ना कोणत्या वनस्पतींची फुलं वर्षभर फुलत असतातच. रसरशीत-गरगरीत फळं, आजारी पडल्यावर बरं करणाऱ्या औषधी वनस्पती, जळणापासून फर्निचरपर्यंत लाकूड पुरवणारे वृक्ष, अन्न, वस्त्र-निवारा अन् जगण्यासाठी लागणारा प्राणवायू म्हणजे ऑक्सिजन पुरवणारी ही हिरवी दुनिया आपल्याला माहिती असते.पण या सगळ्या वनस्पती आपल्याला ओळखता येतात? बहुदा ''येत नाहीत'' हेच खरं उत्तर बाहेर पडेल.

वनस्पती म्हणजे तरी काय? तोंड नसताना पाणी पिणारे, पोट नसताना अन्नपचन करणारे, फुफ्फुसे नसताना श्वसन करणारे सजीव म्हणजे वनस्पती, गायत्री मंत्राची उपासना न करता किंवा फोटोसेल्सचा वापर न करता सौरशक्तीचा वापर करून स्वत:साठी आणि तमाम प्राणीसृष्टीसाठी अन्न तयार करून उदरभरणाचा प्रश्न सोडविणारे परोपकारी सजीव म्हणजे वनस्पती. वपस्पतींच्या ह्या हिरव्या सृष्टीविना तुमचं आमचं अन् सर्वच प्राणीमात्राचं जगणं केवळ अशक्य होईल.

पण या वनस्पती आपण ओळखू शकत नाही, हे काही बरोबर नाही. भूतलावर काही लाख तऱ्हेच्या वनस्पती आहेत. पैकी काही हजार वनस्पतींचा माणूस वारंवार वापर करतो. काही वनस्पतींमधील उत्तम गुणधर्माच्या वनस्पतींची शेती-लागवड तो करतो. आजकाल पाण्याचा दुष्काळ - प्रदूषण-वाढत्या लोकसंख्येचा अन्नपुरवठा- नव्या रोगांवर नवी औषधे -इंधन अशा बऱ्याच प्रश्नांची तीव्रता कमी करण्याचा किंवा ते प्रश्न सोडवण्याचा उत्तम इलाज

म्हणजे वनस्पतींचा अधिकधिक परिचय करून घेणं. यातूनच उद्याच्या प्रश्नांची सोडवणूकही होऊ शकेल.

मेल्व्हिन काल्व्हिन हा नोबेल पारितोषिक विजेता शास्त्रज्ञ दक्षिण अमेरिकेच्या ॲमेझान नदीच्या जंगलात गेला. स्थानिक वनवासींच्या मदतीने त्याने कोपाइबा म्हणजे कोपईफेरा लँग्सडॉर्फी या वनस्पतीचा अभिनव उपयोग जगापुढे ठेवला. रबराच्या झाडापासून जसा चीक मिळतो, जसा त्याचा आपण रबर म्हणून वापर करतो. तसं या कोपाइबापासून आपल्याला शुद्ध डिझेल मिळवता येते. या **डिझेल वृक्षाची जगभर लागवड करून संपत जाणाऱ्या नैसर्गिक तेल–वायू यांच्या सांठ्यानंतर काय? ह्या प्रश्नाचं उत्तर मिळवता येईल.**



खारट पाण्यात वाढणारी स्पायरूलिना ही शेवाळ्याची जात मानवी आहारात तुटवडा असणाऱ्या प्रथिनांचा भरपूर पुरवठा करू शकेल. कित्येक वनस्पतींपासून कॅन्सरसारख्या रोंगावर औषध मिळवता येईल.

हे सारं केव्हा ? आपण वनस्पतींचा परिचय करून घेऊ तेव्हा. पण आजचं युग आहे अंतराळविज्ञान – संगणक – बायोटेक्नॉलॉजी अन् प्लॅस्टिकसारख्या कृत्रिम पदार्थांचं! झाडपाल्याच्या अभ्यासाला काय शास्त्र म्हणायचं? असा हेटाळणीवजा प्रश्नही अनेक शिक्षित विचारताना आढळतात. नव्या शास्त्रशाखांची– ओळख–परिचय वापर तर करायलाच हवा पण आपलं सगळं जीवन ज्या वनस्पतींवर अवलंबून आहे त्यांचाही अभ्यास–ओळख करून घ्यायलाच हवी. वनस्पती नसतील तर मानवजात नष्ट व्हायला– प्राणीसृष्टी संपून जायला केवळ काही तास वा दिवस पुरतील. ह्या हिरव्या मित्रांची उपेक्षा करणं फार धोक्याचं आहे.

बायोडायव्हर्सिटी म्हणजे जैववैविध्य याबाबत भारत देश फार समृद्ध आहे. पण आपली स्थिती कस्तुरीमृगाची आहे. देशभरात असलेल्या वनस्पतींच्या समृद्ध ठेव्याचीच आपल्याला ओळख नसेल तर त्यांचा उपयोग तरी कसा करणार ? गेल्या कित्येक शतकात आदिवासी–गिरिजन–वनवासी मंडळींना अवगत असणारे वनस्पतींचे उपयोग, गेल्या शतकात उदयास आलेले वनस्पती वर्गीकरण व ओळख पटवण्याचे शास्त्र यांचा एकत्रित उपयोगच

उद्याचं सुखी समृद्ध नी आनंददायी जीवन आपल्याला उपलब्ध करून देईल.

**वनस्पती परिचय करून घेण्यासाठी काही उपयुक्त पुस्तके-**

१) **वनश्रीसृष्टी भाग १ व २** - डॉ.म.वि.आपटे

२) **गॅझेटीयर ऑफ बॉम्बे स्टेट**-बॉटनी भाग १-२-३

३) **ऋतुचक्र** - दुर्गा भागवत

४) वृक्ष**गान व फुलवा** - डॉ. शरदिनी डहाणूकर

५) **नॅशनल बुक ट्रस्टची वृक्ष -उद्यान वनस्पती -फळझाडे -भाजीपाला - औषधी वनस्पती -मसाल्यांचे पदार्थ** अशा विषयांवरील अल्पमोली अन् इंग्लिश व विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असलेली ग्रंथसंपदा.

७) **ट्रॉपिका -एक्झोटिका -हार्टिका - फ्लॉवर्स ऑफ द वर्ल्ड** अशी शेकडो किंवा काही हजार रुपयांची, उत्कृष्ट रंगीत चित्रांची पुस्तके.

८) **फ्लोरा ऑफ बॉम्बे प्रेसीडेन्सी** -कुक आणि **फ्लोरा ऑफ ब्रिटीश इंडिया** हुकर हे महत्त्वपूर्ण खंडात्मत ग्रंथ

९) कोणत्याही महाविद्यालयातील ग्रंथालयामधध्ये असणारी वनस्पतींवरील विविध पैलंतून लिहिलेली शेकडो पुस्तके.

■■

## गुरुपौर्णिमा कशी साजरी कराल ?

भारतीय संस्कृतीमध्ये कृतज्ञता व्यक्त करण्याची चांगली परंपरा आहे. ज्यांच्याकडून आपण ज्ञान ग्रहण करतो त्यांच्याबद्दल नित्य रोजच आदर-कृतज्ञता असायला हवी. त्यांचे स्मरण राहावे म्हणून व्यासपौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमेचा दिवस होय. यावर्षी ३० जुलै रोजी गुरुपौर्णिमा आहे. त्यानिमित्त काय काय करू या.

▯ तुम्हाला शिकविणाऱ्या व पूर्वी शिकविलेल्या शिक्षकांना, मुख्याध्यापकांना घरातील वडीलधाऱ्या मंडळींना फुले देऊन नमस्कार करू या. ▯ शाळेमध्ये प्रार्थनेच्या वेळी गुरुपौर्णिमेसंदर्भात सर्वांसमोर बोलून या श्रेष्ठ भारतीय परंपरेचे मनोभावे जतन करू या. ▯ वर्गामध्ये एका तासाला प्राचीन व आधुनिक काळातील गुरुशिष्यांच्या गोष्टी सांगून त्यांना नमस्कार करू या. त्यांचे अनुभव समजावून घेऊ या. ▯ 'ग्रंथ हेच गुरु !' यासाठी शाळेच्या ग्रंथालयाची साफसफाई करू या. सर्व पुस्तके नीट लावूयात. एकतरी प्रेरणादायी चरित्र, ग्रंथ, संतवाङ्मय वाचूयात. ▯ ज्यांच्या ज्यांच्या कडून तुम्हाला काहीना काही शिकायला मिळाले त्यांची आठवण ठेवू या. त्यांच्या गुणांचे स्मरण करू या. समक्ष भेटून अथवा पत्राद्वारा कृतज्ञतेची भावना त्यांच्याकडे व्यक्त करू या. ▯ १० मिनीटे स्वस्थ शांत बसून निसर्गातील विविध गोष्टी, घटनांपासून (उदा.नदी, समुद्र, वृक्ष, ढग इ.) काय काय शिकता येईल याचा विचार करू या. त्यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगून त्यांच्यातील काही गुण अंगी बाणविण्याचा प्रयत्न, संकल्प करू या. ■■

*फुलव पिसारा मोरा, श्रावण येतो आहे, उंच स्वराने वारा स्वागत गातो आहे.*

# महाकवी कालिदास

■ डॉ. भाग्यश्री हर्षे

**आषाढ प्रतिपदा हा कालिदास दिन समजला जातो. त्यानिमित्त महाकवी कालिदास यांचा व त्यांच्या कलाकृतींचा थोडक्यात परिचय.**

**ही** कथा आहे सुमारे १५०० वर्षांपूर्वीची ! एका ब्राम्हणाच्या घरी एक पुत्ररत्न जन्माला आले. सुरूप, सुदृढ आणि बुद्धिमान ! पण लहानपणीच आई निवर्तल्याने तो अनाथ झाला. त्यानंतर एका गवळ्याच्या घरी तो वाढला. गवळ्याने त्याचे पालनपोषण केले, पण विद्येचे संस्कार त्या मुलावर काहीच झाले नाहीत. योगायोगाने जवळच्या नगरीतील एका राजकन्येचे लग्न प्रधानाने कपट करून या देखण्या पण विद्याहीन मुलाशीच लावून दिले. राजकन्येने आपल्या मूर्ख पतीची निर्भत्सना करून त्याला घराबाहेर काढले. नंतर काली देवीची उपासना करून तो महाकवी बनला. देवीच्या प्रसादाने त्याला कवित्व व विद्वत्व यांचे वरदान मिळाले. विद्या संपादून तो घरी परत आल्यावर पत्नीने त्याला विचारले– **'अस्ति कश्चित् वाग्विशेष: ?'** – ''तुझ्या वाणीत काही विशेष गुण आले का?'' त्याबरोबर त्याने या प्रश्नातील प्रत्येक शब्दाने सुरू होणारे काव्य म्हणजे 'अस्ति उत्तरस्यां दिशि देवतात्मा...' या आरंभाचे कुमारसम्भव; **'कश्चित्कान्ता विरहगुरुणा...'** या आरंभाचे मेघदूत आणि **'वाग् अर्थाविव संपृक्तौ...'** या आरंभाचे **रघुवंश** अशी तीन काव्ये धडाधड म्हणून दाखवली.

महाकवी कालिदास यांच्या विषयीची ही कथा सर्वश्रुत आहेच. ही आणि यासारख्या अनेक दंतकथा कालिदासाचे कवित्व, चातुर्य, औदार्य वर्णन करण्यासाठी रचल्या गेल्या. त्यापैकी अनेक कथा 'भोजप्रबंध' या ग्रंथात ग्रथित केलेल्या आहेत. या कथांची सत्यासत्यता हा वादाचा मुद्दा आहे. त्या वादात न शिरता कालिदासाच्या कलाकृतीतून व्यक्त झालेली कालिदासाची प्रतिमा अधिक स्पष्ट, उजळ आहे. त्याच्या विद्वत्तेचे, मतांचे व स्वभावाचे निखळ प्रतिबिंब त्याच्या ग्रंथात पाहायला मिळते. कुमारसंभव व रघुवंश ही महाकाव्ये, ऋतुसंहार व मेघदूत ही खंडकाव्ये आणि अभिज्ञानशाकुंतल, मालविकाग्निमत्र व विक्रमोर्वशीय ही तीन नाटके अशा या कविभास्कराच्या प्रतिभेतून निर्माण झालेल्या सात कलाकृती –जणू वाङ्मयातील सप्तरंगी इंद्रधनुष्यच ! प्रत्येक कलाकृतीचं रसायन मनाला मोहवून टाकणारं–रसीलं आणि आस्वाद्य.

ऋतुसंहार हे निसर्ग वर्णनपर काव्य. ग्रीष्मादी सहा ऋतूंचे वर्णन करताना त्या

ऋतुंचा केवल मानवावरच नाही तर वृक्षवेलींवर आणि पशुपक्ष्यांवर होणारा परिणाम हा कालिदासाच्या नजरेने टिपला आहे.

कुमारसंभवाच्या पहिल्या सर्गात हिमालयाचे मनोहर वर्णन ; तिसऱ्या सर्गात वसंत ऋतुतील वनश्री ; सहाव्या सर्गात ओषधिप्रस्थाचे वर्णन ; आठव्या सर्गात गंधमादन वनातून दिसणारी सायंकाल, रात्र, चंद्रोदय या देखाव्यांचे अप्रतिम वर्णन आहे. ठिकठिकाणी आलेली नगरे, ऋतू, पर्वत, नद्या, वृक्ष यांची वर्णने यांतूनच ऋतूसंहार, कुमारसंभव व मेघदूत काव्य बहरतात. रसिक वाचकाला निर्सगाशी जवळीक साधण्यास सजग व सहृदय बनवितात.

'तारक' या आसुराचा संहार, शिवपार्वती यांचा विवाह आणि कुमार कार्तिकेयाचा जन्म असे कुमारसंभवाचे कथानक ! तर एका यक्षाने एका मेघाकडून आपल्या दूर असलेल्या पत्नीला संदेश पाठविणे–हे मेघदूताचे कथानक. दोन्ही कथानके साधीच पण त्यांना जेव्हा कालिदासाच्या दिव्य प्रतिभेचा स्पर्श होतो तेव्हा ती स्वर्गीय सौंदर्याने उजळून निघतात व त्यांना अधिकच झळाळी प्राप्त होते.

रघुवंशात रघुकुलातील अनेक आदर्शभूत राजांची चित्रणे आहेत. जीवनाची ध्येयभूत पण कठोर आध्यात्मिकता म्हणजे रघुवंश. एक सर्वोकृष्ट महाकाव्य ! नवरसांचा परिपोष घडविणाऱ्या या काव्याने कालिदासाला कविकुलगुरूचा सन्मान दिला, तसेच 'रसेश्वर' ही पदवी बहाल केली.

शाकुंतल, मालविकाग्निमित्र आणि विक्रमोर्वशीय ही तीनही नाटके म्हणजे मानवी हृदयात निरनिराळ्या वेळी उत्पन्न होणाऱ्या भाववृत्तींचा रमणीय आविष्कार ! भारकवी, महाकवी आणि नाटककार या तीनही भूमिका यशस्वीपणे वठल्या कारण कालिदासाच्या नैसर्गिक प्रतिभेला शास्त्राभ्यासाची, कला परिचयाची आणि सूक्ष्म अवलोकनाची जोड मिळाली. अत्यंत उज्ज्वल प्रतिभा, तरल कल्पनाशक्ती, उत्कट भावना, तेजस्वी प्रज्ञा, संवाद चातुर्य, यातून सहज मधुर अशा कलाकृती निर्माण झाल्या.

कालिदासाने आपल्या काव्यांतून तत्कालीन विशिष्ट राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक स्थिती काव्यातून ध्वनित केली. भारतीय संस्कृतीच्या या प्रतिनिधिक कवीने समाजाला अनेक ठिकाणी दिव्य जीवनाचे संदेश दिले. मानव व निसर्ग यातील एकात्मतेचे दर्शन घडवून निसर्गाविषयीचा उदार दृष्टिकोन जतन केला. निसर्गाचे अवलोकन करून त्यातील मार्मिक अंश ग्रहण करणे हे तर कालिदासाचे वैशिष्ट्यच आहे. मेघाला मार्ग सांगण्याच्या मिषाने मध्यप्रदेशातील अनेक स्थळांचे वर्णन केले.

रघुवंशाच्या माध्यामातून आदर्श राजसंस्था चित्रित केली. आर्य संस्कृतीचे काव्यमय रूप तिच्या रोमारोमात भिनवले. लोकजीवनाशी अधिक समरसता साधली. कालिदासाच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा तर जागोजागी प्रत्यय येतो. अक्लिष्ट व प्रसन्न वृत्तीचा हा कवी त्याच्या रसाभिव्यंजक शैलीमुळे रसेश्वर म्हणून सर्वमान्य झाला.

सुभाषिते हा तर कालिदासाच्या वाणीचा रुचिर अलंकारच. त्याच्या कलाकृतींमध्ये सर्वत्र विखुरलेली ही सुभाषिते त्याच्या तरल व प्रगल्भ भाववृत्तींची निदर्शक आहेत. त्याच्या विद्वत्तेची सूचक आहेत.

**विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम् ।**

(कुमार २.५५)

(आपणच पाणी घालून वाढविलेले झाड जरी विषारी असले तरी आपणच तोडणे अयोग्य आहे.)

**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।**

(कुमार ५.३३)

(शरीर हेच धर्माचरणाचे पहिले साधन आहे.)

**क्लेश: फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।**

(कुमार ५.८६)

(कार्यसिद्धीचे क्लेश, कार्य सिद्ध झाल्याने, कार्यकर्त्याला उत्साहित करतात.)

**कार्येषु अवश्यकार्येषु सिद्धये क्षिप्रकारिता ।**

(कुमार १०.२५)

(जरूरीच्या कामात यश हवे असेल तर आळसात वेळ दवडू नका.)

**किमिव हि मधुराणां मण्डनम् आकृतीनाम् ।**

(शाकु.)

(जातीच्या सुंदराला काहीही शोभून दिसते.)

**मनोरथानाम् अगतिर्न विद्यते ।**

(कुमार ५.६४)

(मनोरथ कोणत्या ध्येयामागे लागतील ते सांगता येत नाही.)

**भवन्ति वाचाऽ वसरे प्रयुक्ता ध्रुवं फलाविष्टमहोदयाय ।**

(कुमार १२.४३)

(योग्य प्रसंग पाहून केलेले पबोलणे निश्चितपणे फलप्रद होते.)

**आज्ञा गुरूणां ह्यविचाणीया ।**

(रघु. १४.२६)

(वडील माणसांची आज्ञा निमूटपणे पाळावयाची असते.)

अशी एक ना अनेक सुभाषितरत्ने कालिदासाच्या कृतींमध्ये जागोजागी सापडतात.

ज्याच्या उपमांना उपमा नाही असा हा उपमासम्राट, रससिद्ध कवीश्वर रसिकांच्या हृदयात आजही विराजमान झालेला आहे. त्याच्याबद्दल लिहावे तेवढे थोडेचे.

**काव्येषु रसिकेषु च विश्व वन्दयं रसेश्वरम् ।**
**नामामि कालिदासं तं भारतीय महाकविम् ।।**

■■



अ भ्या स पा य ऱ्या

भाग-२

## अभ्यासातील स्वावलंबन

■ प्रा.महेंद्र सेठिया

मागच्या लेखामध्ये अभ्यासाच्या पहिल्या चार पायऱ्या मांडल्या होत्या. पाठ्यपुस्तकांचे सर्वेक्षण (सर्व विषयांच्या बाबतीत ही पायरी एव्हाना पूर्ण झाली असेल; व्हायला हवी.), धड्याचे पूर्ववाचन, तासातल्या शिकविण्याकडे हेतूपूर्वक लक्ष देणे, व्याख्यान ऐकणे व शंका निरसन-आकलन-मनन अशा पायऱ्या वापरून तुम्ही अभ्यासाला प्रारंभ केला असेल. प्रारंभी या पद्धतीने अभ्यास करायला जादा वेळ द्यावा लागेल. पण त्यामुळे परीक्षेच्या वेळी होणारी धांदल-गडबड-ताण निश्चितच कमी होईल.

अभ्यासाची पुढची पायरी आहे **द्वितीय वाचन व सारांश लेखन.** धडा शिकवून झाल्यावर चौथ्या पायरीमध्ये सुचविल्याप्रमाणे जे वाचन आपण करतो ते प्रामुख्याने शंका निरसन होण्यासाठी असते. धड्यातील सर्व तपशील, संकल्पना, त्यांचे परस्पर संध, भाषेच्या बाबतीत त्यातील शब्दार्थ, वाच्यार्थ, भावार्थ, वाक्यरचना, व्याकरण इ. गोष्टी कळल्या आहेत ना याची पक्की खात्री होण्यासाठी व जे कळले नसेल ते समजून घेण्यासाठी शिकविल्यानंतरचे पहिले वाचन महत्त्वाचे असते. तर **द्वितीय वाचनाचा उद्‌देश धड्यातील महत्त्वाचे मुद्‌दे काढून सारांश लेखन करणे हा असतो.**

धडा दुसऱ्यांदा वाचताना प्रत्येक परिच्छेदातील महत्त्वाचे मुद्‌दे अधोरेखित करावेत. हे मुद्‌दे वाक्यांच्या स्वरूपात असू शकतात किंवा महत्त्वाचे शब्दसुद्धा परिच्छेदाचा सारांश सांगतात. अशा महत्त्वाच्या शब्दांवरून वा वाक्यांवरून धड्याचा आराखडा किंवा सारांश तयार करता येऊ शकतो.

टिपणे कशी काढावीत याबाबत यापूर्वीच्या अंकांमध्ये सविस्तर लेख येऊन गेलेले असल्याने त्याबाबत तपशिलात येथे पुनरावृत्ती करत नाही. टिपणे स्वत:च्या शब्दांमध्ये असावीत. महत्त्वाचे सर्व मुद्‌दे टिपणांमध्ये यायला हवेत. तरी अनावश्यक

शब्द, क्रियापदे, स्पष्टीकरणे, उदाहरणे टाळावीत. शब्दांची लघुरूपे किंवा चिन्हे वापरावीत. टिपणे नेहमीच्या अक्षरांमध्ये काढावीत.

अशा प्रकारचे सारांश लेखन किंवा टिपणे काढणे हे अवघड काम असते. त्याला वेळही पुष्कळ लागतो. त्यामुळे कदाचित सर्व धड्यांच्या बाबतीत टिपणे काढता येतील असे नाही. पण अवघड, लांबलचक, अनेक संकल्पना असलेल्या धड्याची टिपणे जरूर काढावीत. विविध विषयांच्या धड्यांसाठी टिपणे काढण्याचा प्रयत्न करावा. आपण काढलेली टिपणे शिक्षकांना दाखवून त्यामध्ये योग्य त्या सुधारणा कराव्यात. अभ्यासाची गोडी लागायला या पायरीने निश्चितच मदत होते. टिपणे जरी सर्व धड्यांची काढता आली नाहीत तरी द्वितीय वाचन व महत्त्वाच्या मुद्यांना, शब्दांना अधोरेखन (underlining) सर्व धड्यांसाठी आवर्जून करावे. यानंतरची पायरी म्हणजे **प्रश्नोत्तरे लिखाण.** अनेक वेळा धडा शिकवून झाल्यावर धड्याखाली प्रश्नांची उत्तरे लिहिण्याचा गृहपाठ आपणा सर्वांनाच करावा लागतो. बहुतेक वेळा उत्तर म्हणून धड्यातील वाक्येच्या वाक्ये उतरवून काढली जातात. काहीजण तर बाजारात उपलब्ध असलेल्या मार्गदर्शकांचा (गाईडस्) सर्रास वापर करून तयार उत्तर जसेच्या तसे लिहून काढतात. काही अतिहुशार (?) विद्यार्थी मित्र-मैत्रिणींच्या वह्यांमधून उत्तरे आपल्या वहीमध्ये नक्कल (कॉपी करतात) करून घेतात. यातून एक हेतू साध्य होतो तो म्हणजे गृहपाठ झटपट, डोक्याला ताण न देता उरकता येतो. पण त्यामुळे 'आम्हाला गृहपाठ इतका असतो की स्वत:चा अभ्यास करायला, परीक्षेसाठी तयारी करायला, अभ्यास पायऱ्यांचा वापर करून अभ्यास करायला वेळच उरत नाही' ही तक्रार अनेक विद्यार्थी करताना दिसताता.



मुळात गृहपाठ करताना, प्रश्नोत्तरे लिहितानाच ती पुरेशी समजून, योग्य पद्धतीने लिहिली तर परीक्षेसाठीची तयारी त्यातून नक्कीच होते. म्हणून सारांश लेखनानंतर प्रश्नोत्तरे लिहावीत. प्रश्नांची उत्तरे आपल्या सारांशमध्ये सापडतात का? याचा शोध घ्यावा. ज्यांची उत्तरे सापडणार नाहीत त्यासाठी मूळ धड्याचा आधार घ्यावा व त्या मुद्यांची भर सारांशामध्ये घालावी.

उत्तरे लिहिताना ती मुद्‌देसूद लिहिल्यास नंतर पाठांतर करताना व उजळणी करताना हे मुद्‌दे लक्षात ठेवता येऊ शकतात. भौतिक, रसायन, जीवशास्त्र, इतिहास, भूगोल, नागारिकशास्त्र या विषयांची उत्तरे लिहिताना मुद्यांना आकडे घालून ती उत्तरे लिहिली तरी चालेल. भाषा विषयांना मात्र आकडे घालण्याऐवजी एका मुद्यासाठी एक परिच्छेद करावा. परिच्छेद छोटे झाले तरी चालतील. पण यातून त्या प्रश्नात किती मुद्‌दे

आहेत हे चटकन लक्षात येतील.

उत्तरातील महत्त्वाच्या शब्दांखाली रेघ मारावी. म्हणजे उजळणी करताना चटकन ते शब्द आठवून पूर्ण उत्तर डोळ्यांसमोर येऊ शकते. तपासणाऱ्यासही ते सोयीचे जाते.

अशा पद्धतीने प्रश्नोत्तरे समजून-उमजून, शक्यतो स्वत:च्या भाषेत, मुद्देसूद सारांशलेखनाचा वापर करत, महत्त्वाच्या शब्दांना अधोरेखन करत करत लिहिली तर गृहपाठ पूर्ण तर होईलच पण परीक्षेच्या दृष्टीने अभ्यासही होईल. असा मनापासून केलेला गृहपाठ अन् अभ्यास अंगी लागेल. मग अभ्यास काय करू असा प्रश्न पडणार नाहीच. उलट अधिक वेळ कसा अभ्यास करता येईल असा प्रश्न तुम्हाला पडायला लागेल.

एक गोष्ट मात्र लक्षात घ्यायला हवी की दिवसभर तुम्ही फक्त अभ्यासच करायचा नाहीत तर अभ्यासबरोबर मनसोक्त खेळायचंही, जीवलग मित्रमैत्रिणींच्या घरी अधून मधून जाऊन गप्पा मारायच्या, मजा करायची, वाचन-छंद जोपासणे, भटकणे इत्यादिमधला आनंदही लुटायचा. हे सर्व वेळेचे भान राखून केले तर अभ्यासही छान होईल.'अभ्यासाच्या वेळी अभ्यास अन् खेळाच्या वेळी खेळ' हे सूत्र लक्षात ठेवून दिवसाचा दिनक्रम प्रत्यक्षात आणलात तर धम्माल येईल. अभ्यासाला बसलो अन् मित्रांच्या गप्पा आठवत आहेत, खेळातील प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतोय असे चालायचे नाही अन् खेळताना गृहपाठ आठवूनही चालणार नाही. हे एकदम जमणं अवघड आहे पण जाणीवपूर्वक प्रयत्न तर करा. हळूहळू नक्की जमेल. असे जमायला लागले तर दिवसातला ३ ते ३.३० तास अभ्याससुद्धा पुरेसा होईल. पण एवढातरी अभ्यास व्हायलाच हवा बरं का !

अभ्यासाच्या अजूनही काही पायऱ्या आहेत. पुढील अंकात त्या आपण समजावून घेऊ. तोपर्यंत आधीच्या चार अन् या लेखातील दोन पायऱ्यांचा वापर करून अभ्यास सुरू तर करा. पहिल्या घटक चाचणीत याचा फायदा तुम्हाला निश्चित जाणवेल. अभ्यास काय करायचा असा प्रश्न यापुढे कोणाला पडणार नाही, हो ना? ■■


**ज्ञान प्रबोधिनी**
**आयुर्वेद संशोधिका**

५१०, सदाशिव पेठ , पुणे -३०.

प्रसन्न व्यक्तिमत्त्व, उत्कृष्ठ बुद्धिमत्ता, उत्साहपूर्ण शरीर आणि मन यासाठी उत्तम आरोग्य हवे. हे जाणून घेण्यासाठी

**आयुर्वेद पदविका वर्ग**

कालावधी- ६ महिने दर रविवारी
सकाळी ८-३० ते ११
किमान पात्रता- एस्. एस्. सी. किंवा वय ३५ वर्षे पूर्ण केलेली कोणतीही व्यक्ती
शुल्क : रुपये ३५० /-
इच्छुक व्यक्तिंनी वरील पत्त्यावर संपर्क साधावा.

# अधिक मास
# का ?
# तो कोणता ?

■ डॉ. द. बा. पोंक्षे



**स**ध्या आषाढ अधिकमास चालू आहे. भारतीय परंपरेनुसार अनेक चालीरिती घरातील मोठी माणसं करत असतात. पण नेमकं अधिक मास म्हणजे काय? त्याचं शास्त्रीय कारण काय ?

चंद्र, सूर्य, पृथ्वी यांच्या परस्परांशी असलेल्या संबंधामुळे वातावरणात अनेक गोष्टी दिसतात. त्यातीलच एक अधिक मास ! या संदर्भात आपल्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे समजावून घेण्याचा प्रयत्न या लेखातून करू या.

सूर्य आकाशातून फिरत आहे असे आपणास वाटतो. प्रत्यक्षात सूर्य फिरत नाही. सूर्याच्या आकाशातून या फिरण्यास सूर्याचे **'भासमान भ्रमण'** असे म्हणतात. आकाशात सूर्य ज्या मार्गाने भ्रमण करतो आहे असे भासते तो मार्ग वर्तुळाकार असतो. त्याला क्रांतीवृत्त असे म्हणतात. या क्रांतीवृत्ताचे समान बारा विभाग कल्पिलेले आहेत. या विभागांना राशी म्हणतात. अशाप्रकारे मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तुला, वृश्चिक, धनू, मकर, कुंभ, मीन या १२ राशी आहेत. सूर्य एका राशीच्या विभागातून (क्षेत्रातून) दुसऱ्या राशीच्या विभागात (क्षेत्रात) प्रवेश करतो (कर्क व मकर राशीत जेव्हा तो प्रवेश करतो तेव्हा त्यांना कर्क व मकर संक्रांत म्हणतात) एका राशी विभागातून दुसऱ्या राशी विभागात जाण्यास सूर्यास जो काळ लागतो त्या काळास 'सौरमास' म्हणतात. सौरमास हा सुमारे ३० १/२ दिवसांचा असतो. म्हणून काही महिने ३० दिवसांचे तर काही ३१ दिवसांचे असतात. सौरवर्ष ३६५ दिवसांचे असते.

भारतीय पंचांगाप्रमाणे वर्ष १२ महिन्यांचे आहे. ते महिने चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन असे आहेत. महिन्यांची ही नावे नक्षत्रावरून घेण्यात आलेली आहेत. (आश्विनी, भरणी..... रेवती अशी २७ नक्षत्रे आहेत) भारतीय पंचांगाप्रमाणे काही महिने २९ दिवसांचे तर काही ३० दिवसांचे असतात. याप्रमाणे सर्व १२ महिन्यांचे एकूण दिवस ३५४ होतात. म्हणजे दोहोंमध्ये सुमारे ११ दिवसांचा फरक आहे. चांद्रवर्ष सौरवर्षापेक्षा सुमारे ११ दिवसांनी लहान आहे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतू सौरवर्षाप्रमाणे असतात कारण या ऋतूंचा

संबंध सूर्याशी असतो. विशिष्ट सण विशिष्ट ऋतूतच यावेत म्हणून सौरवर्ष विचारात घ्यावे लागते. चांद्रवर्षामुळे पडणारा सुमारे ११ दिवसांचा फरक विचारात घेतल्यास तो भरून काढण्यासाठी २ वर्षे ८ महिने या कालावधीत ३० दिवस या हिशेबाने महिना होतो. म्हणून भारतीय पंचांगात २ वर्षे ८ महिने या काळानंतर कालगणनेत एक जास्तीचा महिना धरतात याला **अधिक मास** (किंवा धोंडा महिना) म्हणतात. (अशा प्रकारे चांद्रमास व सौरमास यात मेळ बसतो.)

प्रत्येक चांद्रमासात सामान्यपणे सूर्याचे एकदा **'राशीसंक्रमण'** होते. म्हणजे सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत गेलेला दिसतो. परंतु सौरमास ३०१/२ दिवसांचा व चांद्रमास २९१/२ दिवसांचा असल्यामुळे एक चांद्रमास असा येतो की त्यात सूर्याचे राशीसंक्रमण होत नाही म्हणून सूर्य आहे त्यात राशीत असतो. हा चांद्रमास अधिकमास मानतात व त्याला पुढच्या चांद्रमासाचे नाव देतात. चालू वर्षात १६ जून १९९६ रोजी ज्येष्ठ महिना संपतो व १७ जून रोजी पुढील चांद्रमहिना सुरू होतो परंतु या महिन्यात सूर्याचे राशी संक्रमण होत नसल्याने १७ जून (प्रतिपदा) ते १५ जूलै (अमावस्या) हा अधिक महिना आहे. यापुढील महिना आषाढ असल्यामुळे या अधिक मासास आषाढ अधिक मास म्हणतात. १६ जुलै (प्रतिपदा) पासून खरा आषाढ (निज आषाढ) महिना सुरू होईल. (ज्या चांद्रमहिन्यात सूर्याचे राशीसंक्रमण दोनदा होते तो महिना **'क्षयमास'** समजला जातो. क्षयमास १४१ वर्षातून एकदा येतो.)

■■

**आपणास माहीत आहे का?** **वासंतिक अंकातील प्रश्नांची उत्तरे**

१. जगातील सर्वात जास्त मूलद्रव्याचे शोध स्वीडन मधील यिटर्बी या गावात लागले आहेत. या गावात यिटर्बियम, टर्बियम, अर्बियम व यिट्रियम या चार मलूद्रव्यांचा शोध लागला.

२. **उष्माघात :** कोणत्याही ऋतुत मानवी शरीराचे तापमान नियमित ठेवणारी यंत्रणा असते. पण या यंत्रणेलाही मर्यादा आहेत. हवा अति गरम व दमट असल्यास शरीरातून अगदी थोडीच उष्णता त्वचेवाटे उष्माघात टाळण्याकरिता उन्हामधून फिरताना शक्यतो डोक्याचा व मानेचा भाग झाकलेला असावा.

३. भारतीय **ज्ञानपीठाचा** २ लाख रू.चा **पुरस्कार**(ताम्र, प्रशस्तीपत्र, पुरस्कार, प्रतीक, वाग्वदेवीची प्रतिमा) १९६६ सालापासून भारतीय भाषातील विशिष्ट साहित्यकारांना त्यांच्या असामान्य व उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल दिला जातो. १९४४ मधे प्रसिद्ध उद्योगपती श्री. शांतीप्रसाद जैन यांनी 'ज्ञानपीठ' सांस्कृतिक साहित्यिक समाज' ही संस्था स्थापन केली व तिच्यातर्फे हा पुरस्कार दिला जातो. मराठी लेखकांपैकी श्री.वि.स.खांडेकर यांना १९७४ साली व श्री.वि.वा.शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांना १९८७ साली हा पुरस्कार मिळाला आहे.

*रुजलं शिवारी मुठीतलं धान ओठी आलं गं मातीतलं गाणं ।*

# पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य

भाग-४

■ प्रा.अनघा लवळेकर




मागील तीनही लेखांत पूर्व पाकिस्तान मध्ये चाललेल्या महानाट्याचा एकेक अंक कसा रंगत गेला ते आपण पाहिलं. शेख मुजीबूर हे जरी या नाट्याचे नायक असले तरी या संपूर्ण नाट्याला कलाटणी देणारा महानायक म्हणजे 'भारत' ! ही कलाटणी कशी मिळाली हे वाचायला तुम्ही नक्कीच उत्सुक असाल.

ज्यावेळी पूर्व बंगाल (पाकिस्तान) मधील नरसंहारामुळे निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले, तसा भारतीय तिजोरीवरचा ताणही वाढला. काही महिन्यांच्या अवधीत सुमारे ५-६ अब्ज रुपये या निर्वासितांवर खर्च झाले. शिवाय पाकिस्तानचा नक्षा उतरवायचा होताच. जनरल सॅम माणेकशांनी युद्धाची तयारी कशी सुरू केली ते आपण थोडक्यात पाहिलंच आहे. प्रत्यक्ष तयारीच्या आठ महिन्यांच्या काळात जनरल माणेकशा आपल्या बळाचा अंदाज घेत होते. यश मिळण्याची चाचपणी करत होते. साधारण एप्रिल ७१ मध्ये एकूण वातावरण आपल्याला अनुकूल असल्याचा अंदाज आला. या सर्व हालचालीत पूर्व बंगाली लोकांचा प्रचंड पाठिंबा आणि सहकार्य आपल्याला मिळालं. त्यामुळे स्थानिक सुरक्षा आणि नियंत्रणाकरिता लागणाऱ्या अवाढव्य फौजेचा आकडा खूपच कमी झाला. पूर्व बंगाली सैनिकांनी तेथील स्थानिक तरुणांनाही शस्त्रास्त्राचं प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. हीच ती प्रसिद्ध 'बांगला देश मुक्तीवाहिनी !' भारतातील शस्त्रास्त्रांच्या आणि दारूगोल्यांच्या कारखान्यांनी अक्षरश: अहोरात्र परिश्रम करून प्रचंड उत्पादन केलं.

याच सुमाराला जनरल याह्याखान हे आपल्या कारवाईला पाठिंबा मिळावा म्हणून राष्ट्राराष्ट्रांच्या प्रमुखांशी बोलत होते. पण भारताच्या पंतप्रधान श्रीमती गांधींनी मुत्सद्दीपणाचं एक आगळंच दर्शन जगाला घडवलं. सुरुवातीला कोणतंच बडं राष्ट्र या आंदोलनाला पाठिंबा द्यायला पुढे येऊ इच्छित नव्हतं. अमेरिका आणि चीनचा आपल्या बळजबरीला नक्कीच पाठिंबा मिळणार अशी याह्याखानांची अटकळ होती. म्हणूनच इंदिराजींनी अमेरिका, चीन आणि रशियाच्या धोरणांकडे बारकाईने लक्ष देऊन मित्रत्वाकरिता रशियाची निवड केली. सुरुवातीला काहीशा तटस्थ असणाऱ्या रशियाला भावनिक आवाहन करून ९ जून ७१ ला ऐकिहासिक भारत -रशिया मैत्री करारात बांधून घेण्यात इंदिराजी यशस्वी झाल्या.


*चाहूल मृगाची लागता मेघराज गरजला, हुंदका आकाशी फुटता थेंब अमृताचा बरसला*

ऑक्टोबरच्या सुरुवातीपासूनच भारतीय सेना सीमांवर जय्यत तयार होती. आक्रमण होण्यापूर्वीच सर्व साधनसामुग्रीसह सीमेवर उभी राहिलेली भारतीय सेना हे इतिहासातील एक दुर्मिळ दृश्य. भारताच्या भूमिकेला आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळावा म्हणून इंदिराजींनी ऑक्टो–नोव्हें. मध्ये युरोपचा एक झंझावाती दौरा केला. ''युद्ध टाळण्याचाच आमचा प्रयत्न राहील पण वेळीच पाकने आपल्या अनिर्बंध अत्याचारांना आळा घालून बांग्लादेशाचे स्वातंत्र्य मान्य केले तरच !'' असे त्यांनी सर्वत्र ठणकावून सांगितले.

ज्या क्षणाची वाट पाहात भारतीय सैन्य सीमेवर आतुरतेने उभे होते तो दिवस उजाडला. ३ डिसेंबर १९७१ या दिवशी खरं तर रात्री – पाकिस्तानी विमानांनी श्रीनगर, अवंतीपूर, पठाणकोट, उत्तरलाई, जोधपूर, अंबाला आणि आग्रा या भारतीय विमानतळांवर हल्ले चढवले. अरबांविरुद्ध १९६७ मध्ये हेच तंत्र वापरून इस्रायलने अरबांची मोठीच हानी केली होती. पण अर्थातच या तंत्राचा वापर पाकिस्तान करणार हा अंदाज न यायला भारतीय सैन्याधिकारी काही दुधखुळे नव्हते. ही योजना पूर्वीच समजल्यामुळे भारतीय विमानदलाने आपली सर्व विमाने 'सुरक्षित स्थळी' ठेवली होती. पाकिस्तानचा हा प्रयत्न फोल गेला पण त्यामुळे भारतीय सैन्याला हवं असलेलं निमित्त सापडलं. भारतीय विमानदलानं सरळ चंदेरी, शोरकोट, सरगोधा, मुरी, मियानमाली, मरूर, रिसालवाला आणि चंगामंगा ह्या पाकिस्तानी विमानतळांवर हल्ले चढवून त्यांचे जबर नुकसान केलं. कमीतकमी काळात युद्धाचा निर्णय लावून बांगला देश मुक्त करणं हेच भारतांच मुख्य उद्दिष्ट होतं. जनरल सॅम माणेकशा आणि पूर्व विभागाचे कमांडिंग इन्–चीफ लेफ्टनंट जनरल जगजितसिंग अरोरा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याच्या व्यूहरचना ठरत होत्या. पाकिस्तानच्या बळाबद्दल निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे अंदाज होते. बांगलादेशातील पाकिस्तानी सैन्याचे प्रमुख होते लेफ्टनंट जनरल अमीर अब्दुल्ला खान नियाझी. त्यांनी त्यांच्या मते दोन महिने पुरेल एवढी रसद गोळा केलेली होती. भारताला बांगला देशात आतवर घुसण्यासाठी महिनाभर तरी लागेल असा त्यांचा अंदाज होता. त्यामुळे तेवढ्या काळात उत्तरेकडून चीन आणि दक्षिणेकडून अमेरिकेच्या सातव्या आरमाराची कुमक आपल्याला मिळेल आणि पराभव टळेल अशी ठाम खात्री त्यांना होती. त्यामुळे बांगला देशात भारतीय सैन्याला घुसू देऊन मग झुंजवत ठेवायचा हा इष्ट पर्याय निवडण्याऐवजी सीमेवरच थोपविण्याचा पर्याय त्यांनी निवडला. अमेरिकेकडून मिळालेली शक्तीशाली अस्त्रे आपल्याकडे आहेतच हा त्यांचा विश्वास होता. त्यांना असं वाटलं की, भारतीय सैन्य नेहमीप्रमाणे धिम्या गतीने आक्रमण करील. म्हणून त्यांनी अंतराअंतरावर बंकर्स तयार करून सारी रसद त्यात विखरून ठेवली.

लेफ्टनंट जनरल जगजितसिंग अरोरांनी खूप विचार करून एक नवीनच धाडसी योजना

आकाराला आणली. सीमेवर शत्रूला लढवत ठेवून सरळ ढाक्क्यावरच हल्ला करणे हा त्यांचा डाव होता. ढाक्क्यापर्यंत लौकर पोचायचे कसे हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा होता. त्याकरिता आमनेसामने लढण्यापेक्षा ज्या ज्या ठिकाणी पाकिस्तानी सैन्ये होती त्या शहरांना वेढा घालून त्यांची रसद तोडायची, पळायच्या वाटा रोखायच्या आणि केवळ शरणागतीचीच वाट मोकळी ठेवायची अशी



योजना त्यांनी आखली. बांगला देशात हवाईदल नावापुरतेच होते. त्यामुळे ह्या मर्मस्थानाचा फायदा उठवण्याचे ठरले. युद्धाच्या पहिल्या दोनच दिवसात बांगला देशातली सर्वच्या सर्व २३ सैबरजेट्स भारतीय विमानांनी केलेल्या हल्ल्यात नष्ट झाली. भारतीय भूसैनिकांच्या माथ्यावर मात्र सदैव हवाई दलाचं छत्र होतं. त्यामुळे भारतीय सैन्याला रसदपूरवठा करणं, छत्रीधारी सैनिक उतरवणं सहज शक्य होतं.


याचबरोबर २०० पाकिस्तानी बोटी आणि २४ रणगाडेही हवाईदलानं उद्ध्वस्त केले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय नौसेनेला युद्धात उतरण्याची ही पाहिलीच संधी होती. त्यामुळे उदंड उत्साह आला. आपला पराक्रम दाखविण्याची नामी संधी मिळाली. त्यामुळे नौसेनेने अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. पूर्वेकडे तर नौसेनेने पाकची शंभर टक्के नाकेबंदी केली. चितगाव, कॉक्सबजार ह्या बंदरांवर विक्रांतने हल्ले चढवून ती बंदरे उद्ध्वस्त केली. पाक नौसेनातील अमेरिकेने

दिलेली एक महत्त्वाची अवाढव्य पाणबुडी 'गाझी' हिला विशाखापट्टणजवळ सागरतल दाखविला. पश्चिमेकडे थेट कराचीपर्यंत अनपेक्षित मुसंडी मारून भारतीय नौसेनेने पाकिस्तानला अचंबित करून टाकले.

याह्याखानांना पूर्वेकडील पराभवाचा धक्का बसला. सूडबुद्धिने त्यांनी 'बांगला देश गेला तर काश्मीर घेऊ' अशी गर्जना करून पश्चिम सीमेवर हल्ले चालू केले. त्याला तसेच तोडीस तोड उत्तर भारताने दिले. पाकिस्तानपेक्षा भारताला खूपच व्यापक भूमीवर लढावे लागत होते. अनेक अडचणी अचानक समोर येत होत्या. पण ह्या कशालाही न जुमानता एका इर्ष्येने सैन्य लढत होते. एका ठिकाणी तर आगेकूच करण्यासाठी सैन्याच्या तुकडीने वीस किलोमीटरचा रस्ता रातोरात बांधून पूर्ण केला. १९६५ च्या युद्धातील निसटत्या विजयावर शिक्कामोर्तब करण्याची आकांक्षा प्रत्येकाच्याच मनात होती. भारत बांगला देश सीमेवर वीस ठिकाणांहून आत शिरकाव करून शत्रूला चुकवत ढाक्क्याकडे कूच सुरू होते. ही 'घेराव' ची कल्पना इतकी उपयुक्त ठरली की पद्मा नदीच्या पश्चिमेकडील 'जेस्सोर' हे लोहदुर्ग म्हणून विख्यात असणारे ठाणे अक्षरश: काहीही लढाई न करता आपल्या ताब्यात आले. तीनही दिशांनी हल्ला झाल्याने नियाझींची कोंडी झाली. त्यात अत्याचारांमुळे संतप्त झालेली स्थानिक जनता आणि मुक्तीवाहिनीचे सैनिक भारतीय सैन्याचा मार्ग अजूनच सुकर करीत होते. अक्षरश: सायकलींवरून, रिक्षातून सैन्याचा दारूगोळा वाहून नेणारे, भारतीय सैनिकांकरिता जेवण घेऊन उभे असणारे बंगाली लोक जणू काही सेनेचाच एक भाग बनले होते.

पाकिस्तानचे मनोधैर्य खचत चालले होते. मुक्तीवाहिनीच्या मदतीने पाक ठाण्यांना मागून अलगद घेरल्यामुळे 'पुढे गेलो तरी भारतीय सैन्य, मागे पळावे तरी भारतीय सैन्य' अशी विचित्र कोंडी पाक ठाण्यातील लष्कराची झाली. जास्त लढाई न करताच या 'निराधार' लष्करानं मग ठिकाठिकाणी शस्त्रे खाली ठेवली. पाक सैन्याचे दळणवळण पूर्णत: तुटले. विस्कळीत झाले. हे खचणारे मनोधैर्य पूर्ण नष्ट करण्याकरता भारताने चढाई सुरूच ठेवली.' शेवटचा सैनिक असेपर्यंत ढाक्का लढवू' अशी वल्गना नियाझींनी केली होती. पण त्यांचेही अंदाज चुकत होते. ८ डिसेंबर पासूनच सॅम माणेकशांनी 'शरण या नाहीतर मरणास तयार व्हा' असा निर्वाणीचा



संदेश धाडायला सुरुवात केली होती. कधी रेडिओ अनाउन्समेंट्सवरून तर कधी ढाक्क्यावर हेलिकॉप्टरमधून पत्रके टाकून हा संदेश पाक सैनिकांपर्यंत पोचवला जात होता. याह्याखानांना अजूनही अमेरिकन आरमारच्या मदतीची आशा होती. ते हिंदी महासागराकडे निघालेही होते. त्यामुळे पाकला लवकरात लवकर शरणागती पत्कारायला भाग पाडणे आवश्यक होते.

११ डिसेंबरला भारतीय फौज ढाक्क्याच्या जवळ येऊन ठेपली. युद्धबंदीची सूचना भारताने साफ फेटाळली. 'संपूर्ण शरणागती किंवा विनाश' एवढे दोनच पर्याय त्यांच्यापुढे खुले होते. अखेर १६ डिसेंबरला त्यांनी शरणागतीचा संदेश अमेरिकन वकिलातीतर्फे पाठवला. दुपारी ४.३१ मिनिटांनी ज्या रेसकोर्स मैदानावर ९ महिन्यांपूर्वी शेख मुजीबांनी असहकाराची गर्जना केली होती – त्याच मैदानावर लेफ्टनंट जनरल नियाझींनी शरणागतीच्या कागदावर स्वाक्षरी केली. ढाक्क्यात हिन्दुस्थानी फौजेनं दिमाखदार संचलन केलं. लोकांनीही त्यांना हृदयपूर्वक मानवंदना दिली. त्यांना अक्षरश: उचलून त्यांची एक जंगी मिरवणूक काढली. ३/४ आठवडे चालेलंस वाटणारं युद्ध भारताच्या एका दमदार घावानं अवघ्या बारा दिवसांत संपवलं आणि तेही विजयश्रीसह !

ह्या युद्धातून चार गोष्टी अगदी स्पष्टपणे प्रतीत झाल्या.

एकतर आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये लवचिकता असली पाहिजे. ज्यामुळे रशियाची अप्रत्यक्ष मदत ऐनवेळी आपल्याला मिळाली.



दुसरे म्हणजे हे धोरण काळानुसार बदललं तरी त्या त्या वेळी अगदी ठाम हवं.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे केवळ धर्माची संकुचित कल्पना ही राष्ट्राच्या निर्मितीचा आणि अस्तित्वाचा आधार ठरू शकत नाही. चौथी गोष्ट म्हणजे या लढाईत झुंज होती तलवारीची (दंडशक्तीची) आणि प्रेरणेची, इर्ष्येची आणि आत्मबलाची (spirit) आणि त्यात पाकिस्तानच्या दंडबलावर भारताच्या आत्मबलाने आणि प्रेरणेने मात केली.

ह्या सर्व रोमांचकारी युद्धाची कहाणी ही तर केवल एक सुरुवात होती. यानंरतची राजकीय परिस्थितीत कशी बदलली? पटावरचे मोहोरे कसे फिरले? आज बांगला देश आणि भारताचं नातं काय आहे? भारतातील घटनांचे पडसाद तिथे कसे उमटले याबद्दल वाचूया पुढील अंकांत! ■■

**प्रगतीला बक्षीस... विशेष अभिनंदन !**

गेल्या वर्षापेक्षा या वर्षीच्या वार्षिक परीक्षेतील गुणांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी विशेष प्रगती केली आहे व ज्यांनी आम्हाला ते कळवले आहे त्या सर्वांची नावे खाली दिली आहेत. त्यांचे **मन:पूर्वक अभिनंदन !** त्यांची बक्षिसे लवकरच त्यांना मिळतील. यावर्षी अभ्यासात अधिक प्रगती करण्याबरोबरच या सर्वांनी अन्यही क्षेत्रांमध्ये (कला, क्रीडा, वक्तृत्व, नाट्य इ.) जाणीवपूर्वक प्रगती करावी. यासाठी शुभेच्छा ! येत्या वर्षासाठी कोणाला या स्पर्धेत सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी पत्र पाठवून नाव नोंदवावे. त्यामध्ये मागच्या वार्षिक परीक्षेतील गुण (टक्के) लिहून पाठवावेत. वर्षभर उत्तम अभ्यास करून बक्षीस मिळविण्यासाठी त्यांनाही मन:पूर्वक शुभेच्छा !

*इ. १० वी १२ वी तल्या सभासदांनी त्यांचा परीक्षेचा निर्णय आम्हाला कळवावा.*

| विद्यार्थी | (९४-९५) | (९५-९६) | वाढ |
|---|---|---|---|
| दर्शन मुंदडा, पुणे | ५९% | ७८% | १८% |
| स्नेहल कुलकर्णी, सांगली | ७५.५% | ९१.५% | १५.७५% |
| रश्मी देशमुख, नागपूर | ६७% | ८१.२% | १४.३% |
| पृथ्वीराज हवालदार, कोल्हापूर | ७६.१५% | ८६% | १०% |
| तृप्ती करमरकर, मिरज | ७४% | ८३% | ९% |
| निलिमा वानखडे, अकोला | ६१% | ५०.५३% | ९% |
| प्राची कुलकर्णी | ८२.२% | ९१% | ८.८% |
| गायत्री चिंधडे | ८४.४२% | ९०.५७% | ८.००% |
| मीनल वानखडे, अकोला | ८४.३३% | ९०.३% | ६.१७% |
| अमृता गोगटे | ८६.५०% | ८९.६७% | ३.१७% |

'प्रगतीला बक्षीस' या स्पर्धेत भाग घेतलेल्या श्रीनिवास वझे, सांगली, अनघा बर्वे, ठाणे, संनदा मेहता, पुरे या तीन सभासदांनी ९०% च्यापुढे गुण टिकवले आहेत. त्यांनी वर्षभरात अभ्यासव्यतिरिक्त अभिनय, संगीत, खेळ अशा विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन.

# गोष्ट मीनाची

श्रीमती शीला पत्की,
■ सोलापूर

**इ.** ५ वी च्या वर्गात मी भौतिक शास्त्र विषयाचे पेपर वाटले. 'अ' चा वर्ग असूनही सर्वांना मार्क्स कमी होते.

शेवटचा नंबर होता मीनाचा. पन्नास पैकी पन्नास गुण ! पेपर सुंदर लिहिलेला होता. अक्षर छान आकृत्या सुंदर; आणि मुख्य म्हणजे अगदी समजून पेपर लिहिला होता. नवनीच आलेली मीना अगदी साधी मुलगी होती. पण खूप हुशार ! मी तिला जवळ बोलावलं, सर्व विषयातील गुण विचारले. सर्वच विषयात उत्तम गुण होते.



आई-वडील काय करतात असं विचारलं. तेव्हा ती म्हणाली, ''वडिलांचं दुकान होतं ते बंद पडलं अन् आई स्वयंपाकाची कामं करते'' मी तिच्या आईला बोलावून घेतलं. आई हुशार वाटली. म्हणाल्या, ''४ मुली व २ मुले आहेत. सगळी हुशार आहेत. पण मी एकटी कुणाकुणाला पुरणार आहे कुणास ठाऊक ! पण बाई मीना सर्वात हुशार आहे. तिला मला डॉक्टर करायची आहे''. आईची जिद्द वाखाणण्यासारखी होती. अन् पोरगी हुशार ! अजून काय हवं होतं?

आम्ही सर्वांनी मीनाला मदत करायची असे ठरविले. कुणी गणवेष, कुणी वह्या, कुणी पुस्तके अशी मदत सुरू झाली. या सगळ्यांच्या मदतीची जाणीव मीनाला होती. एका खोलीतल्या ८ माणसाच्या संसारामुळे अभ्यासाला जागा नाही, घरात वेळेवर जेवण होत नाही असल्या कोणत्याही सबबी मीनाने कधी सांगितल्या नाहीत. नियमित वेळेवर अभ्यास करून मीना शाळेत सतत प्रथम यायची.

*निळा निळा फुटला पान्हा हिरवं हिरवं उगवलं, मातीनं हे धन अंगी सोन्यावाणी मिरवलं*

८ वी नंतर शाळेच्या विद्यार्थिनी भांडारात काम करून तिने मदत मिळविली. घरच्या कामातही मीनाला जास्त काम पडायचे. घर सांभाळणे, स्वंयपाक करणे हेही तिला बघावे लागे. कारण मोठ्या बहिणी कॉलेजात जात व आई सकाळी कामाला.

मीना प्रथम क्रमांकाने १० वी झाली. १२ वी सायन्स करून मेडिकल कॉलेजमध्ये गेली. शाळेच्या माजी विद्यार्थिनी संघटनेकडून मीनाला जेवढी मदत करता आली तेवढी मी केली. अगदी साधेपणाने राहून मीना M.B.B.S. झाली.

रिझल्टचा दिवस होता. माझ्या घरी वडिलांचे श्राद्ध होते. म्हणून मीनाच्या आईच स्वयंपाक करायला आल्या होत्या. मला म्हणाल्या, ''मीनाचा आज निकाल आहे. काय होतेय कुणास 'ठाऊक'? साधारण बारा-साडे बाराच्या सुमारास मीना माझ्या घरी आली. हातात मार्कलिस्ट होती. ६५% गुण मिळवून मीना M.B.B.S.झाली. मीनाने तिच्या आईला नमस्कार केला. मला नमस्कार केला. मी तिच्या हातात २५ रु. बक्षीस ठेवले. ५ मिनिटातच मीना ओढणी बांधून भजी तळायला आईच्या मदतीला बसली. मी म्हणाले, ''मीना तू नकोस आज काही करू.'' त्यावर ती म्हणाली, ''बाई माझ्या मदतीमुळे आईचं काम लवकर आटपेल. मग आम्ही दोघीही लवकर जाऊ आणि डॉक्टरीणच्या हातची भजी तरी खाऊन बघा ना ?'' मीनाच्या ह्या शब्दांनी माझे डोळे भरून आले.

आईच्या व्यवसायाची मीनाला कधीही लाज वाटली नाही. उलट तिला आपल्या आईच्या कष्टाची जाण अन् तिच्या जिद्दीचा अभिमान वाटायचा. पुढे मीना 'M.D.' झाली. मीनाची आई काम करून खूप थकली. मीनाने तिची कामे बंद करून सक्तीची विश्रांती दिली. मीनाचे लग्न झाले. नवरा सर्जन आहे. पुण्याला दोघांनी हॉस्पिटल काढले.

मीनाच्या आई उद्घाटनाची निमंत्रण पत्रिका घेऊन माझ्याकडे आल्या, म्हणाल्या, '' तुमच्या सर्वांच्या मदतीमुळे हे घडलं.'' मीनाला मी शुभेच्छा पाठविल्या. एके दिवशी सकाळीच मीनाची आई एक वर्तमानपत्र घेऊन आल्या. त्यात बातमी होती 'डॉ. मीना यांच्या हॉस्पिटलचा त्यांच्या मातोश्रींच्या हस्ते शानदार उद्घाटन सोहळा पार पडला' मीनाच्या आईच्या डोळ्याला सहस्त्रधारा लागल्या होत्या. जणू सारे शिणवट्याचे दिवस धुवून जात होते. माझेही डोळे गच्च भरले होते. मीनाच्या आईचा हात हातात घेऊन मी म्हटले, ''दारिद्र्यात सुद्धा तुमच्यासारखी जिद्दीची आई मिळाली हेच खरं!'' त्यावर त्या म्हणाल्या, ''माझ्या पोरांना माझ्या दारिद्र्याची लाज वाटली नाही. आपली आई स्वयंपाकीण आहे ह्याची लाज त्यांना कधी वाटली नाही. पण त्याची जाण मात्र त्यांनी ठेवली.'' मीनाच्या आई मीनाच्या यशाने तृप्त होत्या आणि मी मीनाच्या जाणीवांनी अन् तिच्या आईच्या जिद्दीने!

■■

## ओळख स्पर्धा परीक्षांची
## सैन्यातील प्रवेशासाठी

■ शरद गजानन रानडे




दहावी, बारावी, खरं म्हणजे पुढील उच्च शिक्षणाचा पायाच ! आणि हा पाया मजबूतच असायला हवा. त्यामुळेच या पातळीवर बोर्डाच्या परीक्षा आहेत की जेणेकरून बाहेर पडणारे विद्यार्थी उत्तम प्रतीचे असावेत हा मूळ हेतू. पुढील उच्च शिक्षण महत्त्वाचे तर खरेच. आजकाल स्नातक पातळी (Graduation level) ही कुठल्याही अधिकाराच्या नोकरीसाठी किमान अशी पातळी धरली जाते. ओघानेच आले की वरिष्ठ दर्जाच्या अधिकार पदासाठी उमेदवाराची लायकी त्याच्या स्नातक परीक्षेतील कामगिरीवर थोड्या फार प्रमाणात अवलंबून असणारच.

वाढत्या लोकसंख्येनुसार तसेच शिक्षण प्रसाराच्या आवश्यकतेनुसार बारावीनंतरच्या महाविद्यालयांची संख्या भरपूर प्रमाणात वाढली. साहजिकच, स्नातक होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी संख्या पण तेवढ्याच प्रमाणात वाढली. तेव्हा त्यातून हुशार आणि योग्य उमेदवारांची निवड अधिकारी पदाच्या नोकरीसाठी करणे थोडे दुरापास्त झाले. यावर उपाय म्हणून सरकारच्या संरक्षण खात्याकडून तसेच अन्य नागरी खात्याकडून (रेल्वे) अशी एक विचारधारा प्रसृत झाली की अधिकारी पदांसाठी योग्य उमेदवारांची निवड बारावीच्या पातळीवरच का करू नये? अशी निवड केल्यास त्याला आवश्यक आणि त्या संदर्भातील प्रशिक्षण देऊन मग अधिकार पदावर नियुक्त करावे. Catch the young potentials, train them to suit the officer quality need and appoint them."

अशा तऱ्हेच्या विचारांची पकड पक्की होऊन सरकारच्या वरील खात्यांकडून दहावी/ बारावीच्या पातळीवरच उमेदवारांची निवड होते. त्यांनी पुढे पुरेसे प्रशिक्षण देऊन अधिकार पदाच्या जागा दिल्या जातात. अशाच जागांची / वाटांची त्रोटक माहिती देणे हा या लेखाचा मूळ उद्देश आहे.

**अ) दहावी नंतर–**

दहावी पास उमेदवार, संरक्षण खात्यातील जवान, नौसैनिक, वायुसैनिक या

*रक्ताचे नाते दाट असेल पण अश्रुचे नाते घनदाट आहे.*

जगांसाठी अर्ज करू शकतात. परंतु त्या जागा अधिकारी कक्षात येत नसल्याने त्यांचा परामर्श या लेखात घेता येणार नाही.

**नेव्हल आर्टिफिसर –** नौदलातच नौसैनिक आणि अधिकारी यांच्या मधल्या पातळीवरील जागा दहावी पास उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत. यासाठी उमेदवाराची निवड वर्षातून दोनदा लेखी परीक्षा आणि शारीरिक क्षमतेच्या चाचण्यांतून होते. प्राथमिक चाचणी लोणावळा इथे (INS शिवाजी) घेतली जाते. पुढील अंतिम चाचणी ओरिसामधील चिल्का इथे होते. उमेदवारांना चार वर्षांचे प्रशिक्षण देऊन त्यांची Naval Artificer म्हणून नियुक्ती होते. वयोमर्यादा १५ ते १८. वयोमर्यादेत असल्यास बारावी नंतर अर्ज करता येतो. एकदा नेव्हल आर्टिफिशर म्हणून लागले आणि शैक्षणिक पात्रता बारावी असेल तर पुढे काही वर्षांनंतर कमिशन्ड अधिकारी सुद्धा होता येते.

**ब) बारावी नंतर–**

**१) राष्ट्रीय रक्षा अकादमी (NDA)-** **NDA** प्रवेश परीक्षा वर्षातून दोनदा (सप्टेंबर व एप्रिल) होत असते. बारावीत असतानाच सप्टेंबरची परीक्षा देता येते. अर्ज जून व जानेवारीतच करावा लागतो. वयोमर्यादा १५१/२ ते १८ वर्षे आहे. (अर्ज करण्याचे वेळी.) लेखी परीक्षा, मुलाखत आणि शारीरिक तपासणी अशा चाचण्यातून पार पडल्यावरच प्रवेश मिळतो. NDA त तीन वर्षे आणि त्यानंतर एक वर्षाचे मिलिटरी प्रशिक्षण मिळून कमिशन्ड अधिकारी होता येते.

NDA मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी सरकारने काही पूरक (feeder) संस्था काढल्या आहेत. तिथे आधी प्रवेश घेतल्यास प्रवेश परीक्षेची तयारी चांगल्या प्रकारे करता येते. त्या संस्था अशा–

- **सैनिक शाळा–** सरकारने प्रत्येक प्रांतात एक सैनिक स्कूल स्थापन केले आहे. महाराष्ट्रात ही शाळा सातारा इथे आहे. प्रवेश सहाव्या इयत्तेत घ्यावा लागतो. बारावीपर्यंतचे शिक्षण इथेच घेऊन पुढे NDA प्रवेश परीक्षेला बसता येते.
- **खाजगी सैनिकीशाळा–** महाराष्ट्रात नाशिक इथे एक सैनिक स्कूल नुकतेच निघाले आहे.
- **राष्ट्रीय इंडियन मिलीटरी कॉलेज** (RIMC)–
  ही संस्था डेहराहून इथे असून इथे आठवीत प्रवेश देण्यात येतो. उमेदवार सातवी पास आणि तेरा वर्षे वयाचे आत असला पाहिजे. प्रवेश परीक्षा वर्षातून दोनदा (फेब्रुवारी आणि ऑगस्ट) होते. दर सहामाहीला संपूर्ण भारतातून साधारण २५ मुलांची निवड होते. महाराष्ट्रात या प्रवेश परीक्षेचे केंद्र फक्त पुणे इथे आहे.
- **SPI औरंगाबाद –** महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रीयांनी जास्तीत जास्त संख्येने सैन्याधिकारी बनावे या उद्देशाने ही संस्था काढली आहे. दहावी पास झाल्यावर या संस्थेत प्रवेश मिळतो. प्रवेश परीक्षा दरवर्षी

आधीच डिसेंबर महिन्यात होते. इथे बारावी नंतर NDA प्रवेश परीक्षेला बसता येते.

**२) १०+२ कॅडेट एन्ट्री** (टेक्निकल स्किम) – नौदलात नेव्हल इंजिनिअरिंग मध्ये एक आकर्षक योजना गेल्या दहा–बारा वर्षापासून कार्यरत आहे. या योजनेत बारावी पास मुलांची (ज्यांना PCM मधे ७५% च्या वर गुण मिळाले आहेत) सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डातर्फे मुलाखत घेऊन निवड करण्यात येते. वयोमर्यादा १७ ते २०. निवड झालेल्या उमेदवारांना INS शिवाजी लोणावळा इथे चार वर्षाच्या प्रशिक्षणाचा खर्च नौदल करते आणि त्यानंतर नौदलात कमिशन देण्यात येते. याची जाहिरात दर उन्हाळ्यात मे–जून मध्ये येते.


**३) आर्म्ड फोर्सेस मेडीकल कॉलेज** (AFMC) येथील प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता बारावी. वयोमर्यादा १७ ते २० प्रवेश लेखी परीक्षा दरवर्षी मे महिन्यात असते. अर्ज आधीच डिसेंबर / जानेवारी महिन्यात करायचा असतो. सुमारे १२० जागा असतात (१०० मुलांसाठी, २० मुलींसाठी). ४–५ वर्षाच्या शिक्षणानंतर संरक्षण खात्यात कमिशन मिळते.

**४)BSC नर्सिंग / प्रोबेशन नर्स कोर्स –** फक्त मुलींसाठी हा ४ वर्षाचा B.Sc.नर्सिंग किंवा ३ वर्षाचा प्रोबोन नर्स कोर्स आहे. याचे ट्रेनिंग निरनिराळ्या मिलटिरी हॉस्पिटलमध्ये दिले जाते. शैक्षणिक पात्रता बारावी. वयोमर्यादा १७ ते २५. निवड लेखी परीक्षा व मुलाखतींद्वारे होते. निवड झालेल्या उमेदवारांना ४–५ वर्षे मिलीटरी सर्व्हिसमध्ये नोकरी करण्याची हमी द्यावी लागते.

**५) आर्मी इन्स्टिटच्युट ऑफ टेक्नॉलॉजी** (AIT) ही संस्था नुकतीच पुणे इथे सुरू करण्यात आली आहे. बारावी नंतर प्रवेश मिळून इथे इंजिनिअरींगचे शिक्षण मिळते. मात्र प्रवेश फक्त संरक्षण खात्यातील कर्मचाऱ्यांच्या (अधिकारी, जवान इ.) मुलांनाच मर्यादित आहे.

**६) स्पेशल क्लास रेल्वे अॅप्रॅंटीस परीक्षा** (SCRA) ही परीक्षा दरवर्षी मे महिन्यात केंद्र लोक सेवा आयोगाकडून (UPSC) घेण्यात येते. शैक्षणिक पात्रता बारावी. दरवर्षी सुमारे २०–२५ जागा भरतात. यशस्वी उमेदवारांना रेल्वेच्या खर्चाने ४ वर्षाचे इंजिनिअरिंगचे प्रशिक्षण रेल्वे इन्स्यिटयुट जमालपूर (बिहार) इथे दिले जाते. त्यानंतर रेल्वे खात्यातच इंजिनिअरिंग अधिकारी म्हणून नेमणूक होते.

**७) मर्चंट नेव्ही –** मर्चंट नेव्हीत व्यापारी मालवाहू जहाजांवर अधिकारी होता येते. शैक्षणिक पात्रता बारावी पास. वयोमर्यादा २० च्या आत. निवड लेखीपरीक्षा आणि मुलाखतीद्वारे, शिपींग कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचे तर्फे होते. निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण ट्रेनिंग शिप **''चाणक्य''** मुंबई इथे




होते. या संबंधाची जाहिरात साधारण मे जून मध्ये येते. ही सर्व माहिती चटकन ध्यानात यावी या हेतुने आकृती रूपाने वर दिली आहे.

लेख पूर्ण करण्याआधी उत्साही आणि हुशार वाचक विद्यार्थ्यांना सुचवावेसे वाटते की चाकोरीच्या मार्गाने जाण्यापेक्षा वरील मार्ग स्वीकारणे ही एक प्रकारची देशसेवाच आहे. देशाला तुमच्यासारख्या हुशार, तरुणांची नितांत आवश्यकता आहे हे लक्षात असू द्यावे.

**ज्ञान प्रबोधिनी**

**दि. १० जुलै ९६ पासून पुढील वर्ग सुरू होणारे वर्ग (नावनोंदणी ८ जुलै ९६ पर्यन्त)**

**१) बंगालीभाषा वर्ग –** ६ महिने (आठवड्यातून दोन दिवस एकएक तास), शुल्क रु. १५०/–
डॉ.जयश्री गुणे भारतीय विद्या संशोधिकेतर्फे डॉ. सौ. मृणालिनी गडकरी हा वर्ग घेतील.

**२) गीता वर्ग –** शुद्ध उच्चार व अर्थ यावर भर. ४ महिने (दर बुधवारी. एक तास), शुल्क रु ५०/–
संस्कृत संस्कृत संशोधिका (संत्रिका) या विभागातर्फे ज्येष्ट संस्कृत तज्ज्ञ कृष्णशास्त्री कानिटकर हा वर्ग घेतील. **संपर्क : संत्रिका, ज्ञानप्रबोधिनी ५१०, सदाशिव पेठ ३० ४७७६९१**

*निळ्या नभांच्या कमळ कळ्यांच्या उलगडल्या पाकळ्या । पराक्रमाला तुमच्या झाल्या दहा दिशा मोकळ्या*




## सिंहावलोकन चौथ्या वर्षाचे

**सौर श्रावण शके १९१७ ते सौर आषाढ शके १९१८**

**(१९९५-९६)**

- दीपावली विशेषांकाला लागोपाठ दुसऱ्यावर्षी विशेष **'दर्पण पुरस्कार'** मिळाला.
- विनोद विशेषांक व ग्रामीण विशेषांक असे विषयांना वाहिलेले दोन विशेषांक ह्या वर्षी निघाले.
- १९ विषयांवर सुमारे ३०० लेख.
- मुलांच्या तसेच नामवंत साहित्यकांच्या लेखनामध्ये विशेष वाढ.
- बहुरंगी व आकर्षक मुखपृष्ठ छपाई.
- महाराष्ट्र-गोवा-बेळगाव मधील कोनाकोपऱ्यातील वाचकांचा भरघोस प्रतिसाद. खाली वर्षभरातील अंकातील लेखांची सूचि दिली आहे. त्यावरून विषयांचे वैविध्य लक्षात येईल.

खालील क्रमांक हे अंकाचा क्रमांक दर्शवितात.

**कथा**

१) माझा राष्ट्रध्वज, माझा अभिमान २) दोडक्याचा लाडका ३) बुद्धदेवांची गोष्ट ४) उचल बांगडी ४) किरात ४) पेटुकलीतील गचपित ४) हरिसिंह नलुआ चित्रकथा ४) डांबराच्या डोहातील प्राणसंकट ४) मोडकसरांचे डोळे ४) पोथी ५) शिकवणी ५) परतफेड ६) समजुतीचा घोटाळा ६) किल्लीची गुरुकिल्ली ७) मला कंचेंडू पाह्यजेय ८)अतिरेक्यांचा डाव उधळला ८) चिमा आजी ९) एक वेगळी पाटी १०) रानडुकराशी झुंजणारा बालवीर १०) बाळ परतून आला ११) किमया हातच्याची १२) लालबुंद डोळे

(व्यंकटेश माडगूळकर, लीला दीक्षित, विजय देवधर, राजा मंगळवेढेवर, सरिता पदकी, शैलजा राजे, सुधाकर प्रभु, पु.ग.वैद्य, दत्ता टोळ, पंढरीनाथ रेगे, शकुंतला फडणीस, गिरिजा कीर, अरुण देशपांडे, द्वारकानाथ लेले, ज्योत्स्ना देवधर. निनाद बेडेकर)




**गंध मोहवी काव्याचा**

२) बहिणाबाई चौधरी ७) शांता शेळके १०) मंगेश पाडगावकर ११) ग.ह. पाटील १२) झिम्माड पाऊस

(प्रा.शैलजा देशमुख, डॉ.मंदा खांडगे)



## अभ्यासातील स्वावलंबन

१) अभ्यास आनंददायी होण्यासाठी २)गणिताचा अभ्यास भाग-१. ६) गणिताचा अभ्यास कसा कराल भाग-२. ८)आकृत्यांचे रेखाटन व वाचन ११)अभ्यास पायऱ्या भाग-१. १२) अभ्यास पायऱ्या भाग-२.

(महेन्द्र सेठिया, विवेक पोंक्षे)

## विज्ञान करून तर पाहा

१) थर्माकोल कटर २)पवनचक्की तयार करा ३)दळणाचे यंत्र ४)विज्ञान प्रयोग-हवेचा दाब ४)झुलणारा-डोलणारा आकाशदिवा ८)प्रयोग-प्रकाशाचे रंग, आपोआप आग ९)रोपवाटिका तयार करू या ९)अन्न साठविण्याच्या पद्धती १०)रंगीत पाणी वर चढवा १०)फिरता पेरिस्कोप १०)बाटलीत तिरंगी झेंडा

(सविता देशपांडे, शीला पत्की, अंजली तळेगावकर, मंजूषा मुंगी, प्रा. देसाई)

## ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान

१) मी कीटक बोलतोय...... १) वनौषधी-आवळा १) ज्ञान व्यवहाराचे : असे उघडले सुरभिने खाते २) पैठणचे उत्खनन २) पौष्टिक खजूर ४) सूर्यग्रहण पाहणार ना? ४) बाटलीतला अणूराक्षस ४) आधुनिक संपर्क साधने-ई-मेल ५) खग्रास सूर्यग्रहण एका अभ्यासकाच्या दृष्टीतून ६) क्ष-किरणांचा मागोवा ६) पौष्टिक-बेदाणा-मनुका १०) पेजर

(डॉ.आसावरी कानडे, दिलीप कुलकर्णी, डॉ.प्रकाश तुपे, सुयश डाके, डॉ.एम्.बी.साबणे, आनंद राव)

## डोळस भटकंती

प्रा.प्र.के. घाणेकर


१) गॅझेटीअर्स (दर्शनिका) २) महाराष्ट्रातील वन्य प्राणी

३) आकाशदर्शनाचा आनंद सोहळा ४) महाराष्ट्रातील किल्ले

५) परिचय दगडांच्या देशाचा ६)जग भटकावून आणणारा नकाशा(अॅटलास) ८) ओळख शंखशिंपल्यांची

१०) षट्पादांची दुनिया ११) पक्ष्यांची दोस्ती

१२) हिरव्या मित्रांचा परिचय



*उंच पर्वता खोली नसते, खोल सागरा ना उंची । नाना परि दोन्ही असती अगाध खोली अन् उंची।।*



## उद्योजकांच्या कथा

प्रा. अजित कानिटकर

१) उद्योजकांचे उद्योजक-डॉ.आप्पा पेंडसे २) उत्तुंग कल्पनेला कृतीची जोड -जे.आर.डी.टाटा ३) शून्यातून हॉटेल विश्व-ओबेरॉय ४) गुणवत्ता राखणारा उद्योजक-डॉ नीळकंठ कल्याणी ५) प्लॅस्टिक उद्योगाचे पितामह-आबासाहेब गरवारे

## असे हे गणित... असे हे गणिती...

डॉ.जयंत नारळीकर

१) खरे किंवा खोटे २) भारतातील प्राचीन उदाहरणे ३) चक्रव्यूह ४) रामानुजन ५) गोळा-फुलीचा खेळ ६) कार्ल फ्रीडरीश गाउस ७) गणिततज्ज्ञांच्या गमती ८) कूटप्रश्न ९) सर्वात हुशार शेतकरी

## वाचलेच पाहिजे असे काही...पुस्तक परिचय

१) जगप्रसिद्ध स्त्री रत्ने भाग १ व२. २) दुर्दम्य ४) चौघीजणी, पूर्णत्वाचे प्रवासी ७) सुदाम्याचे पोहे ८) नेगल १०) उपेक्षितांचे अंतरंग ११) सूर्यमालेतील सृष्टीचमत्कार १२) पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा

## कला-हस्त कौशल्ये

२)भौमितिक प्रतिकृती -ट्रॅपेझाईड ३)सुंदर आणि सुकर शुभेच्छापत्रे ४)बाटिक ४)सदाबहार सोनचाफा १०)नवरचनेचा आनंद घेऊ या - शुभेच्छापत्रे १०)बहुरूपी घोसाळे ११)करवंटीतून सौंदर्य फुलवा (उर्मिला मुनशी, मधुकर अभ्यंकर, रेखा जोशी, प्रताप मराठे, रत्ना करमकर, संदीप हगवणे)

## अभ्यास देशस्थितीचा




१) काश्मीर-आँखो देखा हाल २) काश्मीर समस्या ३) पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य भाग १. ४) एन्रॉनचा उदयास्त ९) गावकुसाचा विचार विकास १०) वादळ निवडणुकांचे १०) पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य भाग २. ११) पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य भाग ३. १२)पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य भाग ४.

(सचिन गाडगीळ, विक्रम वाळिंबे, प्रा.राम डिंबळे, प्रा. अनघा कुकडे-लवळेकर)



## आरोग्य –क्रीडा

४) झटपट बुद्धिबळ ५) व्यायाम हवाच कशाला ? ६) पल्स पोलिओ ७) शारीरिक तन्दरूस्ती मोजमाप तक्ता ८) देखणे ते डोळुले ९) ग्रामीण आरोग्य १०) उत्सुक अस्वस्थ मनांसाठी ११) बुद्धियुद्ध
(डॉ.कौमुदी गोडबोले, मनोज देवळेकर)

## व्यक्ती परिचय–ओळख कर्तृत्वाची

**४) जीवन त्यांना कळले हो** ध्येयवेड्या व्यक्तींच्या प्रेरणादायी मुलाखती (डॉ. इंदूताई पटवर्धन, जगदीश गोडबोले, डॉ.अनिता अवचट, डॉ.अभय बंग, डॉ.राणी बंग)
**४) माथा टेकवावा अशी पावले** ख्यातनाम व्यक्तींबद्दल त्यांच्या ख्यातनाम सुपुत्र–सुकन्या यांनी लिहिलेली मनोगते.
(गो.नी.दांडेकर, राजा गोसावी, पद्मा गोळे, नसलमल फिरोदिया, इंदिरा संत)
**५) स्मृती ठेवूनी जाती** (कै.त्र्यं.श्री.जोशी) **७)मुलाखत**–मधुकर टिल्लू **८)आम्ही अशा फुललो** (कुसूम काची, ज्योती सुभाषचंद्र, सुषमा देशपांडे, इंदूमती चिपळूणकर) **८)एक स्वयंभू व्यक्तिमत्त्व** इंदिरा गणेश लगडकर १०) असे होते प्रा. रुचिराम साहनी –शब्दांकन सुधा गोवारीकर ११)ध्येयवेड्या सुजाताचे नाव क्षितिज


## ललित

२)'पैसे जमविणार आणि कराटे शिकणार... ३)अजून चालतोचि वाट... माळ हा सरेना ३) माझे आजोबा ३)Draw a Poem ३)एका क्षितिजची गोष्ट ४) गुंता पोरवय ६) ।। अथ श्री क्लास रामायणकथा ।। ७) परीक्षेचा आदला दिवस ७)साहित्यातील विनोद ७) हजरबाबीपणा आणि विनोद ७)विनोदी सुभाषिते ७)हसण्याआधी क्षणभर ८)आम्ही उसळत्या लाटा ९)साकव ९)पहिली माझी ववी गं ८)माळरान फुलवू या ९)डोळस बनू या ९)खेड्या आई ९)जळावीण जीवन कसले १०)भवानीकडा कातळारोहण १२)मीनाची गोष्ट ११) हितगुज–आनंदयात्री
(उषा आठवले, वैशाली नाईक पु.ल.देशपांडे, मल्हार अरणकल्ले, चारुता पुराणिक, अनघा लवळेकर, मंगला गोडबोले, शीला पत्की, रेणु दांडेकर, डॉ.नलिनी गुजराथी, सुहास महाजनी, डॉ.श्रीकांत बहुलकर, डॉ. निशीकांत श्रोत्री, सिंधु भोंडवे, यमाजी मालकर, माधव देशपांडे)



## आपली प्रबोधिनी

५)आत्मविश्वास वाढविणारे अनुभव-तंबूतील शिबिर आणि गिरिभ्रमण ८)आम्ही चितोर युवती-क्रीडा प्रात्यक्षिके ९) रूप पालटू देशाचे - ज्ञान प्रबोधिनी ग्रामविकसन कार्य ११) वेड लावणारी शिबिरे



## कविता

१) भारत राष्ट्र उभारा २) बगीचा २) शोध २) असं जगायचं.... असं जगायचं ! ३) गुरुवंदना ३) गान गाऊ या अन् आरती ! ४) प्रिय आभाळा ४) सावली ४) वरदान ४) पंख पसरूनि विहरे त्याला ९) फुलांचे गाणे ९) आम्ही कोण ? ७) गंमत घर ८) चुकले माझे ९) घरघरतंय गं जातं ९)मातीची ममता १०) झाड सावल्यांचा लळा ११) वसुंधरा ११) निर्सग अमुचा

(प्र.द.जोशी, सुहासिनी, कुलकर्णी, विजया जहागीरदार, किशेर पांक, वि.म.कुलकर्णी, सरिता पदकी, कल्याण इनामदार, सुहासिनी देशपांडे, प्रा.राम डिंबळे, संजीवनी मराठे, गंगाधर महांबरे, हीराबाई घोंघे, ऑस्टिन मऊंबा)

## प्रासंगिक

१) राष्ट्रीय शिक्षण दिलं तरच १) प्रेरणादायी ध्वज २) विनोबांची पंचशील तत्त्वे २) परिसर बदलू या ३) आधुनिक भोंडला गीते ३)'मंत्र स्वच्छतेचा.... मंत्र समतेचा' आचरू या रे ३)अष्टभूजेच्या कन्या आम्ही ४) श्री ज्ञानराजांचे पसायदान ५) ऋतूराज नेहरू ६) उतिष्ठत जाग्रत ८) गुढी पाडवा १०) शिवरायांचे आठवावे रूप... १०) जाती पाती जुनाट भिंती ११) वर्षारंभ उपासना ११) पर्यावरण एक स्वगत १२) अधिक मास कोणता व का? १२) कालीदास दिना निमित्ताने



(यदुनाथ थत्ते, उज्ज्वला सभारंजक, ग.प्र.प्रधान, शैलजा राजे, डॉ.स्वर्णलता भिशीकर, डॉ.न.म.जोशी, प्रा. यशवंत लेले, श्रीहरी पर्वते;. डॉ.द.बा. पोंक्षे डॉ.भाग्यश्री हर्षे)

## स्फूर्तिगीते

१) शतकातुनि २)विश्वात सर्व शोभो....
३) शुभ्र सुगंधित पुष्पे ५) हे आनंदी गाणे



६) तनुमनात.... ७) नवीन पर्व के लिये ८) आम्ही उसळत्या लाटा ९) या माझ्या भारत देशी १०) स्वतंत्रतेच्या स्वर्गामध्ये ११) उजळू द्या जीवना १२) या पुढे यशाकडे

**१० वी नंतर पुढे काय ?**

१०) व्यक्तिमत्त्वाचा बहुदिश विकास ११) लोकशाहीचे आधारस्तंभ होऊ या १२) सैन्य प्रवेशासाठी N.D.A

(डॉ.गिरीश बापट,डॉ.विवेक कुलकर्णी, शरद रानडे)

**स्फुट**

झटपट गणित, का व कसे ? शब्दकोडे, जरा डोके चालवा, शाब्दिक खेळ, इत्यादि अनेक वैविध्यपूर्ण विषय वर्षभरात हाताळले आहेत.

(विशेष ख्यातनाम साहित्यिकांच्या नावांचा उल्लेख यादीमध्ये केला आहे. त्या व्यतिरिक्त अनेक विद्यार्थी व साहित्यिकांनी वर्षभरातील अंकामध्ये लेखन केले आहे.

**सभासदांसाठी उपक्रम**

**ग्रंथालये–** पुणे, सांगली, धुळे येथे चालू सुमारे १२५ विद्यार्थी सभासद.

**प्रासंगिक कार्यक्रम,मेळावे–** सांगली, धुळे, औरंगाबाद, नाशिक, लातूर कोल्हापूर, सातारा, ठाणे, डोंबिवली, रत्नागिरी, परभणी इ. ठिकाणी मिळून १५०० विद्यार्थी सहभागी.

**१० वी अभ्यास मार्गदर्शन –** १४ गावांमध्ये एकूण ९०० विद्यार्थी सहभागी.

**तंबूतील शिबिर :** ऑक्टोबर ९५ –११ गावांमधील ३२ मुली व ५३ मुले सहभागी झाली होती. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील रावडी येथे मुलींचे व महाकोशी येथे मुलांचे शिबिर झाले. मुलींची सहल रायगड–शिवथरघळ येथे तर मुलींची सहल रायरेश्वर–केंजळगड–महाबळेश्वर अशी झाली.

**नेतृत्व शिबिर एप्रिल मे ९६ –**१४ गावांहून ५४ मुली व ३५ शिबिरात सहभागी झाली. पैकी ४२ मुली व २५ मुले पुढची शिबिरे घेण्यासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी गेली.

**व्यक्तीमत्त्व विकसन शिबिरे–मे–जून ९६–**महाराष्ट्रात मुलींची ८ ठिकाणी तर मुलींची १० ठिकाणी शिबिरे झाली. एकूण ६०० मुली व ६२० मुलांनी या शिबिरांमध्ये भाग घेतला.

**संयोजक प्रशिक्षण शिबिर–**एप्रिल ९६–१६ गांवामधून ४७ पालक–शिक्षक सहभागी झाले होते. आपापल्या भागात त्यांनी कार्यक्रमांचे संयोजन करायला प्रारंभ केला आहे.

**पालक शिक्षक मेळावे –** २८ गावांमध्ये पालक व शिक्षकांसाठी मेळावे व्याख्याने झाली. त्यामध्ये सुमारे १४५० पालक आणि शिक्षक सहभागी झाले होते.

(पान क्र. ८ वरून पुढे चालू)

''बनबीर, हुजूर''

''जाओ, बनबीर को नाग लेके बुलाओ''

''आँ ऽऽऽऽ हुऽऽजूर''

''जाओ, जाओ जल्दी जाओ ।''

हरगोविंद धावतच निघाला. इकडे मराठी फौजा जयपूरात घुसल्या. राजवाड्याकडे निघाल्या. मल्हारराव त्यांचा म्होरक्या होता. पहारे कापत मराठी लोक पुढे सरकत होते.

बनबीरला घेऊन हरगोविंद वाड्यात आला. वाड्यात आक्रोश चालला होता. राण्या – नाटकशाळा जमल्या होत्या. सरदार दरकदार धावत होते. एकच कल्लोळ उडाला होता.

''बनबीर, टोकरी लाओ, वही नाग हैं ना जिसने केशवको काँटा था ?''

''व ऽऽऽऽ ही हैं हु ऽऽऽ जूर''

''खोलो टोकरी''

बनबीराने टोपली खोलली. हाताच्या फटक्यानिशी काळा नाग उंचावला,

''फुस्स ऽऽऽऽऽ'' प्रचंड फूत्कार निघाला. दरबारातली मंडळी स्तंभित झाली.

नाग वर उंचावत होता. त्याचे लालबुंद डोळे जळजळत होते. जीभ वळवळत होती. फड्याच्या पाठीवरची दोन पांढरी वर्तुळे स्पष्ट दिसत होती. मल्हाररावाने राजवाड्याबाहेरचे पहारे मारले. बाहेरचा आक्रोश आणि तलवारीचा खणखणाट आतही ऐकू येऊ लागला. एवढ्यात दरबाराच्या पुढेच गलबला झाला.

## लालबुंद डोळे

ईश्वरसिंग धीरोदात्तपणे सिंहासनावरून उठला. शांतपणे पावले टाकीत तो त्या टोपलीजवळ आला. दरबाराच्या दारातला कोलाहल वाढला.


''जय श्रीरामजीकी'' असे म्हणतच ईश्वरसिंगाने त्या काळ्या नागाच्या पुढ्यात हात नेला. तत्क्षणी त्या नागाने ईश्वरसिंगाच्या हाताचा कडकडून चावा घेतला.

''आँ ऽऽऽ'' असे म्हणत ईश्वरसिंग कोसळला.

दरबारचेही पहारे मारत मल्हारराव आत आला. रक्ताने त्याचे शरीर लाल झाले होते. त्याच्या डोळ्यात खदिरांगार होता. डोळे लाल बुंद झाले होते. तो आणि त्याच्या बरोबरचे मराठे धावतच पुढे आले. ईश्वरसिंग जमिनीवर पडला होता. त्याच्या ओठावर फेस दिसत होता. शरीर काळेनिळे होऊ लागले होते. हातापायाच्या आकड्या वळत होत्या. नाग टोकरीत उभाच होता.

मल्हाररावाने तलवार म्यान केली, त्याचे डोळे निवळले. ईश्वरसिंगाच्या कलेवराला मुजरा केला आणि हातापायातील बळ गेल्याप्रमाणे तो परत वाट चालू लागला.

■■



## ''छात्र प्रबोधन'' च्या पुण्यातील वाचकांसाठी सुवर्णसंधी !

यावर्षीपासून ज्ञान प्रबोधिनी युवक विभागाद्वारा पुण्यातील नारायण पेठ, कोथरूड व सहकारनगर या भागामधील क्रीडांगणांवर ५ वी ते १० वीतील मुलांसाठी संध्याकाळच्या वेळात दैनंदिन क्रीडादले सुरू करणार आहोत. या क्रीडा दलांवर देशी व विदेशी खेळांबरोबरच युवक विभागाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होता येईल. सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांचा **मेळावा रविवार दिनांक १४ जुलै ९६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६-३० या वेळात ज्ञान प्रबोधिनी भवनात होईल.**

**दलावरील ठळक उपक्रम**

खेळ, संचलन, पद्य, क्रीडास्पर्धा, गणेशोत्सव, फटाके, विक्री, शिबिरे, सहली,
विशेष क्रीडांगणे, अभ्यासिका

## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

| | |
|---|---|
| **निगडी** | : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४ ८४३८० |
| **सोलापूर** | : ज्ञान प्रबोधिपी बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर २५७८२ |
| **सातारा** | : श्री सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ, सातारा. |
| **सांगली** | : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खडिलकर गल्ली, सांगली. ७७३८२ |
| **कोल्हापूर** | : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. २१५३४ |
| **नाशिक** | : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म.गांधी रोड, नाशिक ५७४८३० |
| **ठाणे** | : डॉ. अजित दातार, बी-२० अहिल्या सोसा., घंटाळी रोड, ठाणे (प.) ५४२१०८७ |
| **डोंबिवली** | : सौ. ज्योती औटी ३-श्री बिल्डींग, टिळकनगर हायस्कूल जवळ, डोंबिवली (पूर्व) ४७४१३९ |
| **रत्नागिरी** | : कु. नीता अ. श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. २२४८७ |
| **धुळे** | : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे. |
| **चाळीसगाव** | : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक, गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव |
| **परभणी** | : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी. |
| **लातूर** | : डॉ. अरुणा देवर, विदद्यानरग, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ४३६१४ |
| **औरंगाबाद** | : १) कर्नल पी.एन.मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७, सेक्टर नं. 'C'N-1 भक्तीनगर, गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद. ४८२६२६<br>२) सौ. स्वाती शरद पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद ३. |

या कार्यालयामध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल. ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधन द्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

**या व्यतिरिक्त मुंबई, अहमदनगर, जालना, जळगाव, रायगड, सिंधुदुर्ग, बीड, उस्मानाबाद या ठिकाणी छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये सुरू करावयाची आहेत. इच्छुकांनी मुख्य कायालयाशी संपर्क साधावा.**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून आषाढ ११ शके १९१८, २ जुलै १९९६

या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिध्द केले आहे.

***बांधिले तोरण जेष्ठाच्या राती, श्रावण गेला आषाढापाठी.***

## 'छात्र प्रबोधन' अनेकांपर्यंत पोहोचण्यासाठी .......

गेल्या ४ वर्षात महाराष्ट्र - बेळगाव - गोवा मिळून छात्र प्रबोधन मासिकाचे ५००० सभासद झाले आहेत. पण अजून अनेकांना हे मासिक माहीत नाही. **'त्या' अनेकांपर्यंत मासिकाची माहिती पोहोचण्यासाठी तुम्ही आमचे प्रतिनिधी व्हा !** खालील मार्गांनी तुम्ही छात्र प्रबोधन अनेकांपर्यंत पोहोचवू शकाल. छात्र प्रबोधनच्या सभासद संख्येमध्ये मोलाची भर घालू शकाल.

- *स्वतःच्या वाढदिवसाला येणाऱ्या **मित्र मैत्रिणींना मासिक दाखवून त्यांना मासिकाचे सभासद होण्यास सुचवा.** आपल्या वर्गातील, शाळेतील, गावातील, एखाद्या गरीब होतकरु विद्यार्थ्याची वार्षिक वर्गणी भरा.*
- *मित्र मैत्रिणींना वाढदिवसानिमित्त, बहिणींना भाऊबीजेनिमित्त तर नातेवाईक - हितचिंतक यांना दीपावली, नववर्षानिमित्त **मासिकाची वर्गणी भेट द्या.***
- *आपल्याकडील **जुने अंक वर्गात घेऊन जा,** ते सर्व विद्यार्थ्यांना दाखवा. मोकळ्या तासांना **त्याचे सामूहिक वाचन करा.** त्यांना मासिकाचे माहितीपत्रक द्या.*
- *आपले आईवडील जेथे नोकरी-व्यवसाय करतात तेथील अन्य व्यक्तींना मासिक दाखवा. त्यांना सभासद होण्यास सुचवा.*
- *गणेशोत्सव, सभा, प्रदर्शने अशा **सार्वजनिक कार्यक्रमांचे वेळी छात्र प्रबोधनचे फलक तयार करून लावा.** सर्वांना मासिकाची माहिती द्या.*
- *गावातील छोट्या-मोठ्या **सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये जाऊन तेथे मासिक दाखवा** व त्यांना सभासद होण्यास सांगा.*

यासाठी तुम्हाला काही प्रचार साहित्य (भित्तीपत्रके, माहितीपत्रके, जुने अंक) हवे असल्यास स्थानिक कार्यालयाशी अथवा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

येत्या महिन्याभरात आपल्यापैकी प्रत्येकाने किमान ५ तरी नवीन सभासद मिळवलेच पाहिजेत. मग करणार ना प्रयत्न !

### ५ व्या वर्षातील नवीन लेखमाला

- ओळख आधुनिक तंत्रज्ञानाची
- संगणक साक्षरता
- निसर्ग परिचय
- भारतीय भाषांची ओळख
- शोधांच्या साहसपूर्ण कथा
- खेळ खेळून तर पाहा
- जादूचे प्रयोग
- वैविध्यपूर्ण मुलाखती
- एकांकिका, नाट्यछटा
- आरोग्य, योगासने

या व्यतिरिक्त विज्ञान प्रयोग - उपकरणे, अभ्यासातील स्वावलंबन, हस्तकौशल्ये - कला - छंद, कथा - कविता, गणितातील गमती, अभ्यास देशस्थितीचा, विकासाचे पैलू, इत्यादी विविधांगी लेख.

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

## यापुढे यशाकडे...



यापुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची ॥ध्रु.॥

शक्ति-युक्ति-बुद्धिने सुजाण यत्न चालवू
संपदा समर्थता उदंड आम्ही मेळवू
सावधान पाउले जयाप्रतीच जायची ॥१॥

वज्रता विनम्रता तनूमनात बाणवू
स्नेहशील एकता निजांतरात तेववू
वीजवादळात ही ज्योत ना विझायची ॥२॥

अजिंक्य झेप आपुली अशक्य शब्द नेणते
'मृगेन्द्रता स्वयं हि एव' मंत्र एक जाणते
सार्थ तो करू अशी शपथ ही वहायची ॥३॥

विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू
तेज मायभूमिचे उभ्या जगास दाखवू
चेतना स्वरातली उरात जागवायची ॥४॥

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎४७७६९१
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** - रु. ८/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १००/-
**प्रकाशन दिनांक** : राष्ट्रीय सौर ११ आषाढ, शके १९१८
२ जुलै, १९९६